सं. वाचनालय, ठाणे
विषय : ज्ञा.२८६
दा. क्र. : १०८००

IRBK-0120800
IRBK-0120800

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 20600 नों. दि. २०।१।८५
वा. नाट्य क्र.
वि.

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पद्दा)
५०००-३-८४

सहर्ष सादर करीत आहोत

रत्नाकर मतकरी लिखित

# सावळ्या तांडेल

IRBK-0120800

दिनपुष्प प्रकाशन

प्रकाशिका/
**सौ. जयश्री श्री. कुळकर्णी,**
दिनपुष्प प्रकाशन,
कृष्णा, १२/B केळेवाडी,
गिरगाव, मुंबई-४०० ००४.

व्यवस्थापक/
**श्री. महेश कुळकर्णी,**

©

**प्रतिभा मतकरी,**
राधा निवास,
टिळक रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

मुखपृष्ठ/
**प्रभाशंकर कवडी**

प्रथमावृत्ती/
जानेवारी १९८४

किंमत :
**बारा रुपये**

प्रकाशन क्रमांक/
२४

मुद्रक/
**श्री. पांडुरंग मोरे**
पॉप्युलर प्रिंटिंग इंडस्ट्रीज,
५१५, भारत इंडस्ट्रीयल इस्टेट,
ठोकरसी जीवराज रोड,
शिवडी, मुंबई-४०० ०१५.

चिमण्या पल्लू उर्फ पल्लवी घारपुरे हीस –

म. ग्रं. स. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. 20800 नों. दि. १९/५/८५
वि. [illegible] क्र. ..................

[illegible] प्रथम प्रयोग सोमवार दिनांक २०।४।१९८० रोजी सकाळी १०-३० वाजता दीनानाथ नाट्यगृह, विलेपार्ले येथे 'बालनाट्य' मुंबई या संस्थेने सादर केला.

| | | |
|---|---|---|
| लेखक आणि दिग्दर्शक | : | रत्नाकर मतकरी |
| नेपथ्य–प्रकाशयोजना | : | शशांक वैद्य |
| रंगमंच | : | श्री. चव्हाण |
| संगीत | : | चंद्रकांत नाईक |
| ढोलकी–साथ | : | मधु यादव |
| ध्वनिसंकलन | : | युधिष्ठिर वैद्य |
| रंगभूषा | : | वर्दम मेकअप सर्व्हिस |
| वेशभूषा | : | प्रतिभा मतकरी |
| द्वंद्व संयोजन | : | प्रभाकर सावंत |

या प्रयोगात काम करणारे कलावंत :

| | | |
|---|---|---|
| शिवाजी महाराज | : | युधिष्ठिर वैद्य |
| तुकोजी | : | वसंत सोमण |
| सावळ्या | : | प्रभाकर सावंत |
| सरूबाई | : | विशाखा पुरव |
| कमळजा | : | विदुला वैदय |
| सुभानजी | : | महेंद्र निकाळे |
| गणोबा | : | हेमंत चिटणवीस |
| जनाबाई | : | मंगल वैदय |
| मुरारी<br>फादर | : | रामविजय परब |
| शंभू गोंधळी | : | सुहास पाटील |
| तात्या वैदय | : | अरविंद औंधे |
| तांडेल (फिरंगी) | : | विकास काशीकर |
| तांडेल (मराठा) | : | रंजन वेर्णेकर |
| मराठे | : | प्रदीप नाईक, देशमुख, रंजन वेर्णेकर<br>संजय दिवेकर, सुरेश भद्रिगे |
| फिरंगी कप्तान | : | सुबोध प्रियोळकर |
| फिरंगी | : | अरविंद औंधे, विकास काशीकर,<br>कालिप्रसाद शहा |
| गायक | : | सुहास पाटील |

# प्रास्ताविक

'सावळ्या तांडेल', हे नाटक कै. नाथमाधव यांच्या 'सावळ्या तांडेल' अथवा 'छत्रपती शिवाजी महाराजांचे आरमार' या कादंबरीवरून स्फूर्ती घेऊन लिहिलेले आहे. 'आधारलेले' असे म्हणता येणार नाही. कारण कथाबीज नाट्यमाध्यमात बसवण्यासाठी व नाटक मुलांच्या दृष्टीने चित्तवेधक होईल, असे करण्यासाठी पात्रे, प्रसंग व काल यांच्या बाबतीत पुष्कळच स्वातंत्र्य घेतलेले आहे. काही पात्रे व प्रसंग तर पूर्णपणे काल्पनिक आहेत.

हे नाटक अगदी लहान मुलांसाठी नसून कुमार-कुमारींसाठी आहे. म्हणूनच बालनाट्यामधल्या विनोदाची जागा इथे साहसाने घेतली आहे. खाष्ट सरूबाई व दारूड्या गणोबा या दोघांची भांडणे मुलांच्या नाटकात शोभतात का, अशी शंका कदाचित येईल. परंतु हे लक्षात घ्यावे, की आजकालच्या मुलांचे अनुभवाचे क्षेत्र खूपच व्यापक झालेले आहे. जीवनाची समजही वाढली आहे. त्यांना या पात्रांच्या वागणुकीमुळे धक्का बसणार नाही. जगातील सर्वच भाषांमधल्या उत्तम कुमार - वाङ्मयात आयुष्यातल्या सौंदर्याबरोबरच विरूपतेचे चित्रणही निःसंकोचपणे केलेले आढळते. किंबहुना या विरूपतेच्या पार्श्वभूमीवरच सद्विचार अधिक खुलताना दिसतो. जशी, सावळ्याच्या भग्न गृहजीवनाच्या पार्श्वभूमीवर त्याचे बहिणीवरचे व आई-वडिलांवरचे प्रेम व पराक्रम अधिक खुलतात.

ऐतिहासिक पार्श्वभूमी, साहसावर दिलेला भर, त्या साहसामधूनच बांधलेले कथानक आणि वेगळे नाट्यपूर्ण प्रसंग यांमुळे मी मुलांसाठी लिहिलेल्या नाटकांमध्ये काहीसे निराळे आणि म्हणून मला महत्त्वाचे वाटणारे हे नाटक आहे.

मुंबई — रत्नाकर मतकरी

## रंगमंचसाहित्य व साधने

*

### पहिला अंक

कुऱ्हडी, कंदील, पैसे, कसा, खलिता, पेजेचं भांडं, चिलीम, शिसा, दोरखंड, दाढी, सुरा, काठी, पडशी.

### दुसरा अंक

#### पहिला प्रवेश

बोटीवरचे सामान, तोफेचे गोळे, पोती, दोरखंड, तलवारी, काठ्या, ढोलकी, तुणतुणं, वात.

#### दुसरा प्रवेश

दिवा (पेटविण्यासाठी), लाकडे, चकमक, २ पेट्या.

### तिसरा अंक

दुर्बीण, होकायंत्र.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०१०० नों. दि २९।१।५
वि. नाटक क्र. ........

## अंक पहिला

[ हल्ली आपण जे टोलेजंग आणि ऐश्वर्यसंपन्न असे मुंबई शहर पाहतो, त्याचे सव्वातीनशे वर्षांपूर्वीचे स्वरूप अगदी वेगळे होते. सात लहान लहान बेटे मिळून त्याला 'मुंबई बेट' असे म्हणत असत. सात बेटांपैकी एका बेटाला 'कुलाबा' असे नाव होते. ह्या कुलाब्यात छत्रपती श्री शिवाजी महा-राजांनी एक रोगीवाडा बांधला होता. ह्या वाड्यात लष्करातील किंवा आरमारावरील लढाईत पंगू, थोटे किंवा जखमी झालेल्या शिपायांस औषधोपचार करीत असत. ह्या वाड्याच्या मागे पुष्कळ अंतरावर इंग्रज व्यापाऱ्यांची एक मोठी वखार होती आणि त्या वखारीच्या डाव्या बाजूला त्यांची बराक होती.

रोगीवाड्याजवळ एका लहानशा भाड्याच्या घरात सरूबाई नावाची एक बाई राहत असे. रोग्यांना पेजपाणी देण्याचे काम तिच्याकडे होते.

सन १६६५ : कुलाब्यातील सरूबाईचे घर, घराबाहेरचा अंगणवजा भाग वेळ रात्रीची.

रोगीवाड्याच्या दिशेकडून एकजण लंगडत लंगडत येतो. हा मुरारी. सरूबाईच्या अंगणातल्या झेंड्याच्या खांबाच्या पारावर चढून, हातातला कंदील उंचावून, तो कुणाला तरी खुणा करतो.

क्षणभरानं मधल्या कुंपणाबाहेर एकजण येतो. त्याची आणि मुरारीची हलकी कुजबूज होते. तो माणूस मुरारीच्या हातावर काही मोहरा ठेवतो आणि बाहेरच्या बाहेर निघून जातो.

मुरारीही, कुणी पाहिलं नाही ना, या हिशेबानं इकडे तिकडे बघतो व लंगडत लंगडत रोगीवाड्याच्या दिशेने परत जातो.

बाहेरच्या दिशेने सावळ्या येतो. तेरा–चौदा वर्षांचा चुणचुणीत मुलगा. त्याच वेळी त्याची धाकटी बहीण कमळजा दारात येते व त्याला पाहते.]

कमळजा : (आनंदून) आई, दादा आला, दादा आला !

[सरूबाई - त्याची आई बाहेर येते.]

सरू : सावळ्या, मुड्द्या, आता उजाडलं वाटतं तुला, घरी यायला ! (त्याचा हात पकडून) मेल्या, तुला घरची काही काळजी तरी ? बाप, तसा तू ! त्या मेल्या दीडदमडीच्या खलाश्याचीच तुझी लक्षणं. (त्याच्या थोबाडीत मारते.)

कमळजा : आई .... नको, ग, मारू दादाला !

सरू : कमळजे, दूर हो - आज ह्या चांडाळाची चांगलीच खबर घेते! बोल ! कुठं गेला होतास इतका वेळ ?

सावळ्या : ब - ब - बराकीत साहेबांचा नाच होता, तो - तो पाहत....

सरू : साहेबांचा नाच होता, काय ? थांब, मेल्या ! आता तुलाच नाचवते. (त्याला मारीत राहते.)

कमळजा : आई, मारू नको ना दादाला !

सरू : तू मध्ये पडू नकोस, कमळजे....आताच मार देऊन वठणीवर आणला नाही, तर बापासारखा खलाशी होईल, हरामखोर ! (मध्येच, मारायचं थांबून) काय, ग, आणि या भिकारड्या सावळ्याला 'दादा' म्हणायला कोणी सांगितलं तुला ?

कमळजा : म्हंजे, ग, काय, आई ! तो माझा थोरला भाऊच नाही का?

सरू : असला, म्हणून?

कमळजा : म्हणून तुकोजीबाबा म्हणाले, त्याला सावळ्या म्हणू नकोस, दादा म्हण !

सरू : तुकोजीबाबा?

कमळजा : हो!

सावळ्या : त्यांना म्हणावं, कमळ, कुठलंच नाव वाईट नसतं. आपण जगात गाजवून दाखवलं, की कुठलंही नाव चांगलंच होतं ! उद्या मी तांडेल झालो, की लोक काय म्हणतील? सावळ्या तांडेल ! मग आवडेल ना तुला आपल्या भावाचं नांव?

सरू : तांडेल होणारेयूस? खबरदार पाण्याच्या जवळ गेलास, तर ! जळ्ळं, भिकारडं खलाश्याचं काय आयुष्य आहे? बायको - पोरं सोडून दोन-दोन, चार–चार वर्षं बाहेर जहाजावर राहतात.

सावळ्या : तू कितीही सांगितलंस ना, आई, तरी मला तांडेलचं व्हायचंय् ! तू मारतेस, म्हणून मी तुला सांगत नाही, आई. बराकीत नाच बघायला गेलो, असं म्हणतो; पण खरं म्हणजे मी समुद्रावरच जाऊन बसतो. पाण्यावर जहाज कसं तरतं, ते बघतो. होड्या कशा वल्हवतात, ते बघतो.

सरू : थांब हो....जहाजं आवडतात काय तुला? आज बस इथंच, नाहीतर जा जहाजावर ! मी तुला मुळी जेवणच वाढायची नाही!

कमळजा : आई, नको, ग, दादाला उपाशी ठेवू !

सरू : तू नकोयूस त्याची बाजू घ्यायला, चल घरात नि आधी जेवून घे.

कमळजा : मी नाही जेवणार.

सरू : त्याला उपाशी ठेवलं, म्हणून तू उपाशी राहाणरेयूस?

कमळजा : नाही काही - तुकोजीबाबांनी सांगितलंय् आज एकवीरा देवीचा उपास करायला. तू एकटीच जेवून घे, जा.

सरू : देवीचा उपास करतेयूस? गुणी पोर, हो, माझी ! (घरात जाते.

सावळया : खोटं सांगितलंस ना ? मी उपाशी, म्हणून तू उपाशी राहिलीस. खरं, की नाही ?

कमळजा : मग काय करायचं ? अगदी वाईट्ट आहे आई !

सावळया : असं नये म्हणू. वाईट असती, तर ती तुझ्याशी इतकं चांगलं वागली असती का ?

कमळजा : पण मग तुलाच का ती अशी हिडीसफिडीस करते ?

सावळया : अग, ती बाप्पाचा राग माझ्यावर काढते ! बाप्पा खलाशी होते ना, म्हणून.

कमळजा : आणि तरी तुला खलाशी व्हायचंय् ?

सावळया : हो. मी ऐकलंय्, की शिवाजी महाराजांनी कोकणपट्टीवर मोट्ठं आरमार उभं केलंय्. आपणही त्या आरमारात जाऊन मोट्ठा पराक्रम गाजवावा, असं फार वाटत मला.

[तुकोजी कडू येतो – हा एक बोलका म्हातारा खलाशी, शरीरावर जागोजागी शस्त्राचे व्रण. एक हात तुटलेला.]

तुकोजी : वाहवा, रे, माझ्या बहाद्दरा ! (त्याला जवळ घेतो.) अशीच जिद्द ठेव ! हिंमत दाखव.

सावळया : तुकोजीबाबा !

तुकोजी : आरमारावर लढण्याची और मजा असते, बाळ ! मी इतक्यां लढाया मारल्या, पण अजून रग जिरली नाही. वाडीच्या सावंता-बरोबरच्या लढाईत हात गेला. म्हणून महाराजांना या कुलाब्यात रोगीवाड्यावरचं काम दिलं. पण अजून वाटतं–जावं जहाजावर आणि लढावं गनिमाबरोबर !

कमळजा : तुम्ही इथं आलात, म्हणून आमचा एक फायदा झाला, तुकोजी-बाबा ! वाड्यातल्या रोग्यांच्या पेजपाण्याचं काम आईला मिळालं.

सावळया : पण काय, हो, तुकोजीबाबा ? महाराजांचं आरमार आरमार म्हणतात, ते आहे तरी केवढं ?

तुकोजी : भलं प्रचंड आहे. गुराब, तरांडी, गलबतं, दुबारं, जिहाडे, पणार मचवे, बाथोर, तिरकटी, पाल—किती प्रकारची जहाजं आहेत, म्हणून सांगू ? चार-पाचशे तर सहज असतील. दोन-अडीच लाख होन खर्च झालाय्—कमी नाही ! अरे, आरमार म्हंजे दर्यावरचं लष्करच ते !

कमळजा : अग्गोबाई, दर्यात कशाला उभारायचं लष्कर ?

तुकोजी : नाहीतर दर्याकाठच्या आपल्या मुलुखाला शत्रूचा त्रास होतो ! आपल्याला कमी का शत्रू आहेत ? फिरंगी आहेत, मोगल आहेत—शिवाय समुद्रावर अंमल असला, की व्यापाराची किल्ली पण आपल्या हातात राहते.

[तुकोजी हे सांगत असताना एक दाढीवाला मध्यमवयीन खलाशी येऊन आडोशाला उभा राहतो.]

सावळया : खरंच, तुकोजीबाबा—मला मिळेल का, हो, एखाद्या जहाजावर जायला ?

[ सरूबाई पेजेचं भांडं घेऊन बाहेर येते. ]

सरू : बसले फताळ्या मारत. सगळया, मेल्या, त्या दरिद्री खलाश्याच्या गोष्टी-ऊठ, सावळया ! मेल्या, वाडयावर घेऊन जा ही पेज ! ( तिन दिलेलं पेजेचं भांडं तो घेतो. ) मेल्या, घाणेरडया, बोटं नको बुडवू त्या पेजेत ! जरादेखील काम नको घरातलं. जहाजा-वर सांगा जायला !

तुकोजी : कशाला, ग बोलतेस त्या सोन्यासारख्या मुलाला ?

सरू : मग ! मला नाही आवडत अस्वच्छपणा ! काडीच्या कामाचा नाही, उंडगा ! त्यापेक्षा मेला असला पोर, तर सुटले असते !

तुकोजी : अग, तुझ्या जिभेला काही हाड ! आज कळत नाहीये तुला त्याची किंमत; पण पोरगा भलताच गुणाचा आहे ! आण, बेटा, मी चिलीम आणायला चाललोय्—मीच देऊन येतो पेज ! (पेजेचं भांडं घेऊन जातो. )

सरू : हूं—गुणाचा, म्हणे ! तोंड बघा माकडाचं ! ( घरात जाते. कमळजा रडू लागते. )

सावळ्या : अग, कमळे, तुला रडायला काय झालं ?

कमळजा : (रडत) आई तुला एकसारखी टाकून बोलते, म्हणून—मला वाईट वाटतं. तू जा, दादा—जहाजावरच जा ! इथं—आईच्या हातचा मार एकसारखा खाण्यापेक्षा—तेच बरं !

[ दाढीवाला खलाशी हळूच पुढं येतो. ]

सावळ्या : अं—तुम्ही कोण ?

खलाशी : मी—मी एक खलाशीच आहे, असं समज ना !

सावळ्या : खरंच ? तुम्ही महाराजांच्या आरमारावर आहात ? (थांबून) फराळ करणार ? ( तो मानेनं 'नको' म्हणतो. ) नको ? मग पाणी तरी घ्याल ? लापशी वगैरे काही—(थांबून) दारू हवीय् का ? तीदेखील मिळेल पलिकडच्या बराकीत.

खलाशी : खरंच मिळेल ? हे घे पैसे—पण तुला कशाला त्रास देऊ ? त्यापेक्षा मीच जातो बराकीतल्या गुत्त्यावर.

सावळ्या : छे छे-त्रास अजिबात नाही. उलट, बराकीतला गोरा गुत्तेवाला मला प्रत्येक शिशामागं एक शिवराई देतो. दिवसाला दोन-तीन शिवराया मिळतात मला.

खलाशी : असं ? मग जा आण. या घे चार शिवराया. दोन शिवरायांची दारू आण. आणि दोन ठेव तुझ्यापाशीच खाऊला.

सावळ्या : (आश्चर्याने) तुम्ही खूप श्रीमंत दिसता, नुसते श्रीमंत नाही, मनानंही चांगले. त्याशिवाय आमच्यासारख्या गरीब मुलांची तुम्हांला दया आली नसती. आलोच हां मी. (जातो.)

खलाशी : काय, ग ! आई सावळ्याला नेहमीच अशी टाकून बोलते, ग ?

कमळजा : तुम्हांला काय माहीत ?

खलाशी : मी पाहिलं मघाशी. का रागावते ती त्याच्यावर ?

कमळजा : का, सांगू ? त्याला आमच्या बाप्पांसारखी दर्याची गोडी आहे, म्हणून.

खलाशी : कुठायत तुझे बाप्पा ?

कमळजा : लहानपणीच गेले कुठं तरी. आई म्हणते, मोगलाई आरमारावर गेले. लोक म्हणतात, महाराजांच्या आरमारावर.

[चिलीम घेऊन तुकोजी येतो.]

तुकोजी : तू कोण, बाबा ?

खलाशी : मी ? मी खलाशी आहे महारांजाच्या आरमारातला. चिलीम बघू.

तुकोजी : घे-घे, बाबा. (खलाश्याला चिलीम देतो. तो चिलमीचे एक-दोन बार भरतो.) महाराजांच्या आरमारावरचा खलाशी, म्हणजे माझा भाऊच तू ! कुठल्या जहाजावर असतोस ?

खलाशी : दर्यासागर तांडेलाच्या. गेली पाच वर्षं आहे यांच्याबरोबर पोर्तुगीज चाच्यांचा पुरता बंदोबस्त केला आम्ही गेल्या पाच वर्षांत. पण आता येऊन पाहतो, तर इथं जिकडे तिकडे टोपीवाले इंग्रज दिसताहेत.

तुकोजी : असतील-पण घाबरून आहेत महाराजांना!

सरू : (बाहेर येत) सावळया, ए सावळया....(खलाश्याकडे तिची नजर जाते.) आँ! हे-हे कोण ? (घरात जाऊन धाडदिशी दरवाजा बंद करते.)

खलाशी : ही या मुलांची आईच ना ?

तुकोजी : हो. दोन पोरं-पण त्यांच्याशी वागण्याच्या दोन तऱ्हा. तशी टापटीप आहे; पण टाकमटिकली फार !

खलाशी : वागणं तरी सभ्यपणाचं आहे का ? जरा नटवो दिसते. त्यातून घोव जवळ नाही, म्हणून विचारतो.

तुकोजी : ते सोड, बेटा. वागणं एक नंबरचं शुद्ध. काय सांगू तुला, तिच्याकडे वर मान करून कोणी पाहायचं नाही. असा तिनं दरारा बसवलाय् !

[सावळया दारूची बाटली घेऊन येतो.]

खलाशी : जा, तुझ्या आयशीला म्हणावं-याच्याबरोबर खायला सुकी मासळी पाठव.

[सावळ्या दारापर्यंत जातो, दार ढकलतो. ते उघडत नाही. दारावर धक्के देतो.]

सावळ्या : आई–ए-आई-दार उघड–मी आलोय्, सावळ्या ! (कान देऊन ऐकतो.) आई म्हणते–मी नाही उघडणार दार !

खलाशी : कशी नाही उघडत, ते बघतो. (दारावर धक्के मारीत) सरू! दरवाजा उघड ! उघडतेस, की नाही ?

तुकोजी : म्हंजे तुम्ही ओळखता सावळ्याच्या आईला ?

खलाशी : ओळखतो म्हणजे ? ती माझी बायको !

तुकोजी : म्हंजे ? तू गणोबा, की काय? पाच वर्षांपूर्वी तिला सोडून गेलेला

[दार धाड्दिशी उघडून सरू बाहेर येते.]

सरू : काय, हो ? आता आलात मोठमोठ्यानं गर्जना करायला 'दार उघड–दार उघड' म्हणून ? आज पाच वर्षांवर दिवस होऊन गेले, एक वेळ तरी ही दोन सोन्यासारखी पोरं मेली, की जिवंत आहेत, याचा शोध करायचा होता ! मी किती दुःखात-हालात दिवस काढले, ते त्या खंडोबाला ठाऊक. (रडू लागते.)

गणोबा : सोंगं नकोत तुझी ! सोन्यासारखी मुलं काय ? या सावळ्याला किती छळतेस, ते प्रत्यक्ष डोळयांनी पाहिलंय् मी ! येताजाता मारतेस काय त्याला ? थांब, आता सोडत नाही तुला ! (कमरेला बांधलेला, तागाचा, जाड वळलेला दोन हात लांब दोर काढतो, आणि तिला मारू लागतो.) बोल ! मारशील त्याला ?

सरू : नाही, हो पुन्हा नाही मारणार-सोडवा, हो, कुणीतरी–मला सोडवा.

[कमळजा तुकोजीकडे धावत जाऊन भीतीने त्याला मिठी मारते]

गणोबा : बघतो आता, कोण तुला सोडवायला येतो, ते! (मारीत) चांडाळणी– माझ्या संसाराची माती केलीस, आणि आता माझ्या मुलावर हात टाकतेस? तुझा नवरा खलाशी आहे, याची तुला लाज वाटते, नाही? मर–अशीच मर!

सावळया : (मध्ये पडत) नाही, बाबा–मी नाही तुम्हांला तिला मारू देणार! कशीही असली, तरी ती माझी आई आहे! (तिच्या अंगावर पडतो. त्यालाही एक–दोन फटके बसतात.)

गणोबा : (मारायचा थांबतो) आज या पोरापायी वाचलीस! नाहीतर प्राणच घेणार होतो तुझा!

[दारूची बाटली उघडतो आणि दारू पिऊ लागतो. सरू कण्हत घरात निघून जाते. कमळजा सावळयाजवळ जाते आणि त्याच्या पाठीवर बसलेल्या फटक्यांचे वळ पाहू लागते.]

तुकोजी : बरं नाही केलस, गणोबा! आज पाच वर्षांनी परत आलास! आणि आल्या आल्या बायकोला झोडपलंस!

गणोबा : तुम्हांला माहीत नाहीय्, बाबा, तिची करणी! म्हणून असं म्हणताय्! तिच्या टाकमटिकलीला भुलून मी तिच्याशी लग्न केलं! पण एक दिवस तिच्यापासून सुख नाही! रोज भांडण-कटकट!

तुकोजी : म्हणून सोडून गेलास तू तिला?

गणोबा : कोण? मी सोडून गेलो? खोटं आहे! हिच्या या कटकटींना कंटाळून मीं दारू प्यायला लागलो. पाच वर्षांपूर्वी एकदा मी नशेत असताना हिनं मला मोगलाई आरमाराला विकून टाकलं. पैसे स्वतः घेतले आणि त्या खलाश्यांना मला उचलून न्यायला सांगितलं.

सावळया : मोगलांच्या जहाजावर?

गणोबा : होय, बेटा. जहाज परक्या धर्माचं, म्हणून मी दोन दिवस अन्न-पाणीसुद्धा घेतलं नाही. नशिबानं तिसऱ्या दिवशी महाराजांचं

जहाज भेटलं. मोगलाई शिद्दीच्या बंदोबस्तासाठी चाललं होतं ते. त्यांनी तोफा डागल्यावर आमच्या मोगल जहाजानं घाई-घाईनं शीड चढवून दिशा बदलली. त्या धांदलीत मी हळूच समुद्रात उडी टाकली ! आणि महाराजांचं जहाज गाठलं.

तुकोजी : आता उद्या गप्पा मारू. मी जातो वाड्यावर. बरीच रात्र झाली. झोप आता. थकून आलायस. फार पिऊ नकोस. राहा आल्यासारखा. पण बायकोला मारू नकोस, हो ! (जातो.)

गणोबा : (आता त्याला दारूची धुंदी चढू लागली आहे.) ये झिला, माझ्याजवळ ये....मला पाहू दे तुला. कुठं लागलं, रे, तुला मघाशी ? बघू. अजून वळ आहेत ! (त्यांना थोडी दारू लावतो.) कसं मारलं, रे, मी तुला ? इतक्या दिवसांनी भेटलास, आणि मी तुला दिलं काय, तर फटके ! वाईट आहे, नाही मी ?

सावळ्या : नाही, बाप्पा, तुम्ही चांगले आहात. मला न्याल तुमच्याबरोबर ?

कमळजा : आता कुठ्ठं जाऊ नका, बाप्पा. नाही ना जाणार ?

गणोबा : नाही जाणार. इथंच राहणारेय् थोडे दिवस मी. फार थकलोय् मुलूखगिरीनं. आता थोडे दिवस तरी किनाऱ्यावर काढायचेत. पण नंतर कुठंही गेलो–तरी, सावळ्या, तुला बरोबर नेल्याशिवाय राहणार नाही....राहणार नाही....माझ्या सोबत....

[बोलता बोलता नशेत झोपी जातो.]

कमळजा : दादा, बाप्पा इथंच झोपले. चल, आपण घरात जाऊन झोपू.

सावळ्या : इतकं झाल्यावर आई दार उघडून आपल्याला घरात घेणारेय् !

कमळजा : मग काय करायचं ?

सावळ्या : इथंच झोपू आपण !

कमळजा : मला भीती वाटते !

सावळ्या : हात्तेच्या, घाबरायला काय झालं ? मी आहे ना ? आपण कधीच, कुणालाच घाबरायच नाही, झोप, तू.

[तो तिला थोपटतो. हळूहळू ती झोपी जाते. सावळयाही अर्धवट झोपेत, मध्येच तो खाड्दिशी जागा होतो, तेव्हा हातात सुरा घेऊन सरू गणोबाच्या उशाशी उभी असलेली दिसते. तो भारल्यासारखा पाहतच राहतो.]

सरू : (किंचित हसून) मेल्या, मला मार दिलास काय ? थांब आता ! सरू आहे म्हटलं, मी ! अशीतशी नाही.

सावळया : (भानावर येऊन ओरडतो) आई !

[पण तेवढ्यात सरूनं आपल्या हातातल्या सुऱ्यानं गणोबाची दाढी कापून टाकली आहे.]

सरू : (हसत हसत) काय पण ध्यान निजलंय् ! अहाहा !! मेल्यानं गोसाव्यासारखी दाढी वाढविली होती ! मी जिवंत असताना टाकली, की नाही का न ? सोंगाच्या लक्षातदेखील आलं नाही. (हसत हसत जाते.)

सावळया : बाप्पा–बाप्पा लवकर, लौकर उठा !

[तरीही गणोबाला जाग येत नाही. तेव्हा बाजूच्या लोट्यातलं पाणी घेऊन सावळ्या तोंडावर मारतो.]

गणोबा : (खडबडून उठून बसत) काय झालं, सावळया ? – काय झालं ?

सावळया : तुमची दाढी, बाप्पा!

गणोबा : म्हणजे ?

सावळया : आईनं कापली ! बरं तर बरं - मला वाटलं होतं, ती सुऱ्यानं तुम्हांला ठारच मारत्येय् का काय ?

गणोबा : त्या चांडाळणीनं माझी दाढी कापली ? थांब आता ! तिला जिवंतच ठेवीत नाही !

सावळया : थांबा, बाप्पा....

कमळजा : बाप्पा–बाप्पा—

[पण गणोबा आवेशानं दार ढकलून घरात जातो.]

सावळ्या : कमळे—तू जा अशीच्या अशीच आणि तुकोजीबाबांना घेऊन ये! मी त्याचं भांडण सोडवण्याचा प्रयत्न करतो! नाहीतर बाप्पा खरंच तिला ठार मारतील!

[आतून गणोबाचे मारण्याचे आवाज आणि सरूच्या मोठ-मोठ्यानं फोडलेल्या किंकाळ्या कमळजा पळत जाते.]

सावळ्या : बाप्पा—बाप्पा— सोडा तिला—

[असं म्हणून दार ढकलून आत जाणार, एवढ्यात गणोबाच सरूसकट बाहेर येतो. त्यानं तिची मानगूट धरली आहे.]

सावळ्या : बाप्पा - सोडा तिला - अशानं मरेल ती.

गणोबा : मरायलाच हवीय् - तू मध्ये पडू नकोस, सावळ्या -

[तिला ढकलून देतो. ती जमिनीवर निश्चेष्ट होऊन पडते.]

सावळ्या : आई - आई - बाप्पा, ही मेली तर नसेल?

गणोबा : बरं झालं, मेली, तर! तिच्या वागण्याची बक्षिसी तिला मिळाली! (नेहमीच्या सवयीनं दाढीवरून हात फिरवतो. दाढी न लागल्यामुळं चिडून) काय करू, रे - माझ्या दाढीची आठवण झाली, की हिला पुन्हा पुन्हा ठार मारावी, असं वाटतं!

सावळ्या : आई - आई, ऊठ ना! बाप्पा, काय झालं असेल, हो, हिला?

गणोबा : (अजूनही रागातच) मेली असली, तर बरंच झालं! त्रास वाचला माझा आणि तुझाही! आजपासून तुझा मार चुकला!

सावळ्या : बाप्पा - आई खरंच मेली? (तिच्या नाकाजवळ हात नेऊन श्वास पाहतो. अंगाला हात लावून पाहतो. भयंकर घाबरलेला.) बाप्पा - पाहा हो, तिचं अंग थंड थंड -

गणोबा : (भानावर येऊन) काय - काय म्हणालास, सावळ्या?

सावळ्या : आई - खरंच गेली, हो, बाबा? (ओक्साबोक्सी रडू लागतो.)

गणोबा : (भयंकर घाबरून) काय - मेली? पण, सावळ्या - ती - ती मरावी, म्हणून नाही, रे, मी तिला मारलं - (कमळजा तुकोजीला

घेऊन येते. ) तुकोजी - तुकोजी - ती मेली ! ( कमळजा धावतच जाऊन तिच्या अंगावर पडते. )

कमळजा : आई - आई - (हंबरडा फोडून रडते. )

सावळया : तुकोजीबाबा - ( हुंदका गिळून ) तात्या वैद्यांना बोलवायला हवं ना ?

तुकोजी : मी सांगितलंय् येताना. मलमपट्टी घेऊन यायला सांगितलं होतं.

गणोबा : (कावराबावरा) वैद्य यायच्या आधी मला जायला हवं, तुकोजी... मी जातो इथून - नाहीतर बायकोचा खून केला, म्हणून मला पकडून माझा कडेलोट करतील, हो !

तुकोजी : थांब - चाललास कुठं ? तू खून केलायस ! तुला शिक्षा व्हायलाच हवी !

गणोबा : बाबा, मी कुणाचा खून करण्याइतका वाईट नाही, हो ! केवळ रागाच्या भरात मी हे केलं. त्यात दारूच्या नशेमध्ये माझा तोल राहीला नाही. या दारूनं माझा घात केला ! ही दारू भयंकर आहे, तुकोजीबाबा ! आजपासून मी दारूच्या थेंबाला हात लावीन, तर शपथ !

तुकोजी : दारू सोडणारंय्स तू ? कायमची ? (तो मान डोलावतो.) महाराजांच्या सच्च्या खलाश्याला शोभण्यासारखं वागणार आहेस ? शपथ घे—नाहीतर मी तुला सोडणार नाही!

गणोबा : या सावळ्या नि कमळी शपथ—तुकोजीबाबा—आता मी दारूचं नाव सुद्धा घेणार नाही !

तुकोजी : मग जा—लौकर जा—

सावळया : बाप्पा, कुठं चाललात, बाप्पा ? मला घेऊन जाणार होता ना तुमच्यासंगत ?

गणोबा : (गहिवरून) नाही, बेटा, तुझ्या नशिबाचा तू तुझं नशीब चांगलं आहे. माझ्यासारख्या खुनी माणसाबरोबर कशाला बांधून घेतोस स्वतःला ? मी जातो. एकटाच जातो. (कमळजेला जवळ घेऊन पोरी, आता, तुझं कस होईल, ग ? मी चांडाळानं

काय केलं हे? पोरी, आता तुझा सांभाळ तुझा दादाच करील! (कमरेच्या पिशवीतले काही पैसे तुकोजीला देऊन) बाबा, आता तुम्हीच या पोरांचे आईबाप! त्यांना सांभाळा. मी जातो.

तुकोजी : लौकर जा. इथं थांबणं धोक्याचं आहे. पोरांची काळजी करू नकोस. मी आहे त्यांना.

गणोबा : तुम्ही देवमाणूस आहात, बाबा! (त्याच्या पायाला हात लावतो.)

सावळ्या, कमळजा : (त्याला मिठी मारून) बाप्पा ऽ

[तो क्षणभर त्यांना मिठी मारून राहतो. मग तुकोजी मुलांना बाजूला करतात. गणोबा जातो.]

कमळजा : दादा –बाप्पा गेले–आई गेली. आता कसं होणार, रे, आपलं

सावळ्या : (तिची समजूत काढीत) रडू नकोस, कमळे! मी आहे ना तुझा दादा. मी नाही सोडणार तुला एकटं; आता तुला मी नि मला तू. झालंच तर हे तुकोजीबाबा आहेत! आपण पोरके थोडेच आहोत?

तुकोजी : (डोळे टिपत) नाही, बाळांनो! या शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्रात कुणीच पोरकं नाही! तुमचे ते थोरले पिताजी आहेत, तोवर तुम्ही कधीच अनाथ होणार नाही!

सावळ्या : बाबा, मला त्यांच्या आरमारात लौकर भरती करा. आता कोणासाठी मी इथं राहायचं?

[तात्या वैद्य येतात. डोक्याला टक्कल आणि पाठीवर कुबड.]

तात्या : कोण आजारी आहे?

तुकोजी : ही बघा—इथं पडली आहे. पण आता तुमची गरज लागेलसं वाटत नाही!

तात्या : म्हणजे, रे, काय तुकोजी! मला बोलावलेस कशाला? म्हणालास, मलमपट्टी करायला चला.

तुकोजी : बरं-आलाच आहात, तर बघा तिला.

तात्या : कसला आजार आहे ? मानसिक आहे, की शारीरिक ?

तुकोर्ज : दोन्ही आहेत. पण तपासा एकदाचे.

तात्या : दोन्ही, म्हणजे काय ? त्वचारोग आहे, की मांसरोग आहे, की रक्तरोग आहे, की हाडरोग आहे ?

तुकोजी : अहो, तात्या–सर्व रोग आहेत. पण तुम्ही तिला तपासा आधी.

तात्या : ही जिवंत आहे, की मेली आहे ?

तुकोजी : अहो, हे सगळं तुम्हीच ठरवायचं आहे. वैद्य तुम्ही आहात– आम्ही नाही !

तात्या : (तपासून) मला वाटतं, ही मेलीच आहे–कुणी मारलं हिला ?

सरू : (एकदम उठून बसून) वा ! तात्या, आजपर्यंत तुम्हांला मी फार सज्जन मनुष्य समजत होते ! अशा अपरात्री येऊन बाई-माणसाच्या अंगाला हात लावता ?

तुकोजी : काय प्रकार आहे हा ! अग, सरू–तू मेली होतीस ना ?

सरू : सुरुवातीला आली होती मला झीट. पण नंतर म्हटलं, राहावं तसंच पडून, आणि बघावं एकेकाची कशी तंतरते, ते ! दिलं, की नाही घालवून त्या मेल्या खलाश्याला ? आता जन्मात फिरकायचा नाही इकडं माझ्या अंगावर हात टाकायला ! तुम्ही एक बरं केलंत, तुकोजीबाबा–शप्पथ घ्यायला लावलीत त्याला दारू सोडण्याची !

तात्या : पाहिलात या तात्या वैद्याचा हातगूण ? मेलेली बाई हात लावल्याबरोबर उठून बसली !

सरू : मेल्या, आता जातोस, की माझा हातगूण दाखवू तुला ! (तात्या वैद्य पळून जातो.) (सावळ्याला) आणि तू, रे, ? निर्लज्जा–निघाला होतास ना त्यांच्याबरोबर जायला ? मग ऊठ–माझ्या घरी नकोस तू ! नीच ! चालता हो इथून ! परत आलास, तर, मेल्या, तंगडं मोडीन ! हो चालता ! आजपासून मला तुझं दर्शन नको ! आज तू मला मेलास, असंच मी समजेन–चल, ग, कमळे ! (कमळजेला घेऊन घरात जाते.)

कमळजा : (जाता जाता) दादा, दादा....

सावळया : तुकोजीबाबा–आईचे असे शब्द ऐकण्यापेक्षा वाटतं, खरंच मरून जावं !

तुकोजी : तुझ्यासारख्या पराक्रमी मुलानं असं बोलू नये, बेटा !

[सुभानजी येतो–एक वृद्ध तांडेल.]

तुकोजी : (विलक्षण आश्चर्यानं) कोण? सुभानजी ? छे ! सुभानजी कुठून जिवंत असणार ? तो तर बायकोसह बुडून मेला ! –पण मग–माझे डोळे मला चकवीत तर नाहीत ना ?

सुभानजी : नाही, तुकोजी, तुम्ही पाहता, ते खरंच आहे, मीच तो दुर्दैवी सुभानजी नाईक !

तुकोजी : सुभानजी ! (दोघे एकमेकांना कडकडून मिठी मारतात.) काय सांगू, सुभानजी, मी तर समजत होतो, की सहा वर्षांपूर्वी त्या भयंकर तुफानात तुम्ही आणि तुमची बायको–दोघंही बुडून–

सुभानजी : ती गेली, बिचारी त्या खवळलेल्या दर्यामध्ये ! दुर्दैवानं मी एकटाच वाचलो.

तुकोजी : पण, नाईक आज इतक्या वर्षांनी इथं कसे आलात?

सुभानजी : सध्या महाराजांचं आरमार आमच्या वसईच्या खाडीत उतरलं आहे. त्या आरमारावरच्या तांडेलांकडून मला तुम्ही इथं कुलाब्याला असल्याचं कळलं.

तुकोजी : काय सांगावं, नाईक, इथं रोगीवाडयावर देखरेख करायचं काम महाराजांनी दिलंय् खरं–पण इथं जिवंत असून नसल्यासारखं वाटतं. हात तुटला, तरी अजून लढाईची खुमखुमी नाही गेली!

[एक जासूद खलिता घेऊन येतो.]

जासूद : तुकोजी तांडेल आपणच का ?

तुकोजी : मीच ! कुठून आलास तू?

जासूद : कुल्याच्या सुमंतानं आपल्यासाठी खलिता पाठवलाय्, तो घेऊन वाडयावर गेलो होतो. तुम्ही इथं आल्याचं कळलं.

तुकोजी : माझ्यासाठी खलिता ? नवलच आहे ! आजकाल माझा आरमाराशी संबंधच कुठं राहिलाय् ? वाच, रे, बाबा, सावळया—

सावळया : (वाचीत) फिरंग्यांनी कुर्ला प्रांतात शिरून काही ब्राह्मण व इतर मिळून वीस-बावीस लोक पकडले आहेत. आणखी पकडण्याची त्यांची खटपट चालू आहे. गावातील लोक घराबाहेर पडण्यास धजत नाहीत. करिता आमच्या कुमकेला आरमार पाठवावे.

तुकोजी : याचा अर्थ काय ?

सुभानजी : याचा अर्थ कुर्ल्याच्या सुमंतांना अजूनही तुमचे पूर्वीचे दिवस आठवताहेत.

तुकोजी : पण कुलाबा बंदरात एकही आरमार नाही. आहेत, ती फक्त साधी जहाजं ! असं मी कालच ऐकलं.

सुभानजी : प्रसंग कठीण आहे ! कुर्ल्याला तर कुमक जायलाच हवी. आपल्यासारख्या जुन्या तांडेलांनी मदत केली नाही, तर कुर्ल्याच्या सुमंतानं कोणाच्या तोंडाकडे बघायचं ?

तुकोजी : पण आपण तयार असून काय उपयोग ? आरमार असल्याशिवाय काय करणार ?

सावळया : तुकोजीबाबा, माझ्यासारख्या लहान मुलानं बोलू नये, पण मनातलं सांगितल्याशिवाय राहवत नाही.

सुभानजी : काय म्हणतोस, पोरा ?

सावळया : आपण एक साधं जहाजं घेऊ. त्यावर जाण्यासाठी तुमच्यासारखे आठ-दहा अनुभवी लोक घेऊं. दारूगोळा जमा करू. वाडयात एक चालू तोफ आहेच ! एवढयानं नाही का भागणार ?

सुभानजी : काय, म्हणतोस काय, बेटा, तू ?

सावळया : हवंय् कशाला आरमार ! नुसत्या अंगातल्या हिमतीवर वेळ निभावून नेता येईल.

तुकोजी : तू-तू येशील आमच्याबरोबर ?

सावळ्या : नाहीतरी मला आईनं घरातून बाहेर काढलंच आहे. आता पाण्यावरच माझं घर! इथं मरावसं वाटतं आहे! शत्रूशी चार हात करताना मेलो, तर जन्माचं सार्थक होईल! तुमचा आशीर्वाद आणि महाराजांची कृपा असल्यावर काय अशक्य आहे?

सुभानजी : तुकोजी, श्री अजाण मुलाच्या तोंडून आपले महाराजच बोलले, असं समजू आणि निघू आपण साहसाला—

तुकोजी : पण आपण दोन म्हातारे—हा लहान मुलगा—

सुभानजी : पराक्रमाला वय नसतं, तुकोजी, या पोराच्या अंगातील हिंमत विसरताय्, तुम्ही! जरा विचार करा—महाराजांनी स्वराज्य स्थापन केलं, तेव्हा त्यांचं वय काय होतं? मदत कोणाची होती?

जासूद : मग, काय निरोप दयायचा सुमंतांना?

तुकोजी : त्यांना म्हणावं—काळजी करू नका. कुलाब्याहून लौकरच कुमक येतेय्.

सावळ्या : मग बोला—हर हर महादेव!

सगळे : हर हर महादेव!

* पडदा *



## अंक दुसरा

### प्रवेश पहिला

[कुलाब्याहून निघालेल्या जहाजाचा डेक. डेकवर मोक्याच्या जागी एक तोफ लावलेली. जहाजाचे शीड फडफडत आहे. वेळ संध्याकाळची. जहाजावर सावळ्या, सुभानजी नाईक, तुकोजी-बाबा आणि शंभू गोंधळी यांच्याशिवाय आणखी फक्त सहाजण सगळेजण जहाजावरील कामे करीत आहेत.... सावळ्या टेहळणी करीत आहे.]

तुकोजी : सावळ्या, दिसतंय् का, रं, कुठं काही ?

सावळ्या : नाही, बाबा. केव्हापासून बघतोय्-पन फिरंग्यांच्या जहाजाचा पत्ता नाही.

सुभानजी : वाहवा, रे, माझ्या मर्दांनो ! आपण मूठभर माणसं पण मनात हिंमत धरुन कुलाब्याहून जहाज तर घेऊन निघालो. तुम्हांला शिवाजी महाराजांचं नाव घेऊन चला, म्हटलं-निघालात ! प्राणाच्या भयानं कुणी यायला कचरलं नाही ! शाब्बास, रे, वीरांनो ! आता शत्रूचं नाक कापून महाराजांच्या चरणाशी परत जाऊ, एवढंच करा. आपला शत्रू फिरंगी-तो मातला आहे, बेधडक गावात शिरून बायकामुलांना धरून गुलाम म्हणून विकायला लागलाय्. चेऊलच्या खाडीतली वीस-पंचवीस बायकामुलं तो घेऊन चाललाय्, अशी बातमी आहे.

तुकोजी : नुसती बायकामुलंच्च नाही–महाराजांची पंचवीस हजारांची लूट सुद्धा आहे.

सुभानजी : हिंमत धरा. फिरंग्यांवर हल्ला करून या बायकामुलांना सोडवून त्यांच्या मुलामाणसांत परत नेऊन सोडू, खजिना सोडवून आणू, अशी जिद्द धरा. मायभवानी तुम्हांला यश देईल. बोला–हर हर महादेव !

सगळे : हर हर महादेव !

सावळ्या : नाईक, आम्ही सगळे शपथा घेतो, की फिरंग्यांबरोबर दंगल झाली, तर आम्ही लढताना कुचराई करणार नाही. लढताना प्राण गेले, तर जन्माचं सोनं झालं, असं समजू. आपल्या या छोट्या पलटणीचा महाराजांना अभिमान वाटेल, असं वागू. काय, गड्याहो ? खरं, का नाही ?

सगळे : खरं हाय, खरं हाय !

सावळ्या : सुभानजी नाईक आपला तांडेल, त्याची इज्जत राखणार, का नाही ?

सगळे : राखणार—राखणार !

सावळ्या : आपल्या कुळाचं नाव उजळ करणार, की नाही ?

सगळे : करणार—करणार !

सावळ्या : मग बोला–हर हर महा....देव !

सगळे : हर हर महादेव !

सावळ्या : छत्रपती श्रीशिवाजी महाराज की.......

सगळे : जय !

सावळ्या : नाईक–आपण माणगावच्या खाडीपर्यंत आलो. तरी अजून फिरंग्यांचं जहाज काही दिसत नाही ! मघापासून टेहळणी करतोय्–जहाज कुठं असेल मग ?

सुभानजी : पोरा–तुला लढाईची भलतीच खुमखुमी आलीय् ! तुझी उतावीळ समजू शकतो मी ! पण थोडा धीर धर ! आता दिसेलच फिरंग्यांचं जहाज ! आपल्याला चुकवून जाणार कुठं ते ?

तुकोजी : हां, पण एकदा जहाज भेटलं, की मग मात्र माघार घेऊन चालायचं नाही.

सावळया : ते बघालच तुम्ही! (दुसऱ्या बाजूला जातो.)

सुभानजी : तुकोजी, या पोरानं आपल्यासारख्या म्हाताऱ्यांना देखील लाज आणली! आरमारावरच्या लढाया खेळता खेळता केस काळ्याचे पांढरे झाले—पण असला तेजस्वी मुलगा मी कधी पाहिला नव्हता!

तुकोजी : त्यांच्या अंगात जसा काही कसला तरी दैवी संचार झालाय्!

सावळया : (तुकोजीकडे येत) तकोजीबाबा, आपल्याबरोबर त्या शंभू गोंधळयाला कशाला घेतलाय्, हो? तो काय लढणार आहे थोडाच?

तुकोजी : शंभू—अरे बाबा, इकडे ये- हा विचारतोय्, तू कशाला आलास लढाईवर?

**शंभू : कोण विचारतोय्? हा सावळया?**
**अरे, तुला ठाऊक नाही, बावळया...**
**मी आहे मर्दांचा मर्द, वीर, वीराचा!**
**माझ्यापुढे शत्रू कापतो थरथर, त्याची धरते वाचा!**

सावळया : तुकोजीबाबा, भलताच गमतीदार दिसतोय हा शंभू गोंधळी!

तुकोजी : नुसताच गंमत करीत नाही—खरंच पराक्रमी आहे तो!

सावळया : माफ करा, गोंधळीबाबा—मला ठाऊक नव्हतं!

**शंभू : अरे, तुला काय माहीत माझा पराक्रम?**
**मी कित्येकांना म्हणायला लावलाय् राम**
**अरे पोरट्या, तुला काय सांगू?**
**फत्तेखान सरदारानं घातला होता पुरंदर किल्ल्याला वेढा**
**लढाईत झाला माझा डावा पाय लंगडा**
**शाईस्ताखान, तो औरंगजेबाचा मामा, बिलंदर बोकोबा**
**तो बसला होता पुण्यात धरून महाराजांवर दबा**
**तेव्हा महाराजांनी त्याला बेसावध ठेवून केला हल्ला**

शहरातून काढली आम्ही खोट्या लग्नाची वरात
आणि नेले सगळे लढवय्ये वाजत गाजत गात
समजलं का?—वरातीतनं कोण नेले? लढवय्ये कसलेले!
त्या वेळला पोवाडे म्हणून, समद्यांना जागवणारा कोण?
हाच शंभू गोंधळी. पटली ओळखीची खूण?
महाराजांनी बक्षिसी दिली–दिलं शेलापागोटं
आणि मारली पाठीवर थाप–ते बक्षीस सर्वांत मोठं.

सावळया : गोंधळीबाबा तुमच्यासारखी कामाची माणसं फार थोडी. वरातीतल्या लढवय्यांना पोवाडे म्हणून स्फूर्ती दिलीत. आज आम्हांलाही शत्रूला तोंड देण्यासाठी जागं करा—

शंभू : हां–करूया ना. त्याचसाठी तुमच्याबरोबर आलोय ना? ऐका, रे सगळे–आणि साथ द्या आम्हांला—(पोवाडा गाऊ लागतो.)

माझे गायन आधी गणा। सकळिक ऐका चित्त देऊन।
नमियेली देवी शारदा। ल्यायली जडिताचे भूषण।
नमिला सद्गुरू नारायण। सद्गुरूच्या प्रसादे संपूर्ण
अंबेचे हो वरदान। भोसल्या सरजा दलभंजन।
गाईन राजाचे भांडण॥ जी जी जी
फिरंगी जुलमी अति माजला।
उतरवू त्याचा नक्षा आज चला।
जो हिंमत धरतो, त्याला। खंडेश्वरी यशवंत करी त्याला।
गाऊ या राजाच्या लढाईला॥ जी जी जी

[सावळयाचे लक्ष समुद्राकडे गेलेले]

सावळया : (एकदम ओरडून) फिरंगी! —फिरंगी जहाज! लौकर!

[एकच गडबड उडते.]

शंभू : जय भवानी आई, जय खंडेराया–बळ दे; शक्ती दे!

तुकोजी : धांदल करू नका–धीरानं काम करा. (वल्हवेणाऱ्यांना) फक्त दोघांनी वल्ही मारा! तुम्ही दोघांनी लढाईत हात चालवायचा

नाही! फक्त वल्ही मारायची ! तोफ डागली, की शत्रू सावध होईल ! तोफ डागताक्षणी चौघांनी जहाजावर चढून जायचं आणखी दोघं मागच्या बाजून जातील ! पहिले कप्तानाला जेरबंद करा ! मग इतरांना तलवारीच पाणी दाखवा !

शंभू : शौर्याची शर्थ करा! घरदार-सगळं सगळं विसरून जा! जगलो वाचलो, तर आपल, नाहीतर कृष्णार्पण, असं समजा! शौर्याची शर्थ करा! जगलात, तर कीर्ती मिळेल ! मेलात, तर ! देहाचं सोनं होईल! बोला-हर हर महा....देव!

सगळे : हर हर महादेव !

सावळ्या : तुकोजीबाबा-जहाजं टप्प्यात आलं!

तुकोजी : चला-चढाई सुरू-बोला-शिवाजी महाराज की जय! डागा-तोफ डागा!

[एक तांडेल तोफ डागू लागतो.]

सावळ्या : थांबा !

तांडेल : तू कोण, रं, हुकूम देणार? तुकोजीनं हुकूम दिलाय्.

सावळ्या : पण तुम्ही तोडा चुकताय्.

तांडेल : (चिडून) तू कालचा पोर न् माझी चूक काढतोस?

सावळ्या : रागावू नका, तांडेल पण अशी डागून तोफ फुकट जाईल. आणा ती वात माझ्याकडे. मी बरोबर दिशेला तोफ डागतो.

तांडेल : चल हट्-म्हणे, मी तोफ डागतो. तोंड धुऊन ये खाऱ्या पाण्यानं

[सावळ्या वात घेण्यासाठी त्याच्याजवळ जातो. तो त्याला रागानं दूर ढकलतो. तुकोजी हे सर्व पाहत आहे.]

तुकोजी : तांडेल! डागू दे त्याला, एवढं म्हणतो, तर !

तांडेल : तुकोजी, आपला जल्म गेला तोफा डागण्यात-आणि हा पोर मला शिकवतोय्! ह्येनं अजून तोफ पाह्यल्याली बी न्हाई.

तुकोजी : लहान मुलांचा असा हिरमोड करू नये, तांडेल. तो पोर तोफ कशी डागतो, ते तर पाहू.

तांडेल : पण गोळा फुकट जाईल—

तुकोजी : गेला, तर गेला! (किंचित चिडून) ही वेळ वाद घालण्याची नाहीये, तांडेल! हं—सावळ्या, आटप—

सावळ्या : शिवाजी महाराज की—जय—

[तोफेची दिशा किंचित फिरवून तिला डाग देतो. तोफ उडते. फिरंगी जहाजावर हाहाकार ऐकू येतो.]

तुकोजी : (सावळ्याला कडकडून मिठी मारून) शाब्बास माझ्या वीरा! (इतरांना) अरे, बघितला याचा पराक्रम? फिरंगी जहाजाला बरोबर मध्ये भोक पडलं! सावळ्या गड्या! डाग पुन्हा बंदुक! तुकडे तुकडे होऊ देत जहाजाचे!

[सावळ्या पुन्हा दारूगोळा भरून तोफ तयार करतो.]

सुभानजी : तुकोजी—भोक पडलं, तरीसुद्धा गनिमानं जहाज आपल्या जहाजाला भिडवलंय्.

एक तांडेल : जहाजाला भोक पडल्यामुळं बरीच गडबड उडालीय्!

दुसरा : तरीदेखील गनिमांचं बळ बरंच मोठ आहे! खूप लोक आहेत त्यांचे! समुद्रात उड्या टाकून आपल्या जहाजावर चढताहेत ते!

[म्हणे म्हणेपर्यंत जहाजावर फिरंगी तांडेल चढून येतात. तलवारीची लढाई सुरू होते. सावळ्या मोठ्या हिमतीनं आपली बाजू सांभाळू लागतो. थोड्याच वेळात तो कित्येकांना घायाळ करून समुद्रात ढकलून देतो. तुकोजी देखील केवळ एका हातानं लढतो. पण फिरंग्यांची ताकद अधिक ठरते. एक फिरंगी सावळ्याच्या हातावर फटका मारतो. त्याबरोबर त्याच्या हातातली तलवार लांब उडते. तो ती घेण्याचा प्रयत्न करतो. थोडा वेळ झटापट होते. तलवारीजवळ पोचलेल्या सावळ्याच्या हातावर फिरंगी पाय देतो. तलवार स्वतः उचलतो.]

फिरंगी : (हसत) देख, दोस्त-तुझ्या या हुशारीचा काही उपयोग नाहीये इथं! सगळं सामसूम झालंय्.

तुकोजी : होय, सावळ्या - माझ्याही हातातली तलवार त्यांनी काढून घेतली, रे !

सुभानजी : सावळ्या, बेटा - तू जिवापाड लढलास ! पन नशिबानं साथ दिली नाही, रे ! इतक्या पोरवयात अशी प्राणाची बाजी लावून लढणारा वीर मी आजवर कधीच पाहिला नव्हता, पण पोरा– आता तुझ्या या झुंजीचा काही उपयोग नाही, रे –

सावळ्या : नाही–नाईक ! आपण लढायला हवं ! प्राण जाईस्तोवर लढायला हवं !

सुभानजी : कशानं लढणार, वेड्या? आपल्याकडे आता शस्त्र कुठं आहे सगळ्या तलवारी त्यांनी काढून घेतल्या–तिघांना पाण्यात ढकललं ! बाकीचे इथंच कुठं तरी जखमी होऊन पडलेत, रे ! त्यांच्यापैकी काही जगतीलही–पण काहींची आशा सोडलेली बरी !

सावळ्या : (तुकोजीकडे जात) बाबा, तुम्ही बरे आहात ना?

तुकोजी : होय, बेटा. मी बरा आहे. पण त्या शंभूच काय झालंय्, बघ.

सावळ्या : (शंभूकडे धावत जातो.) शंभू–शंभू–अरे ऊठ ना ! तूच असा पडून राहिलास, तर आम्हांला कोण जागवणार?

शंभू : (रक्ताने न्हालेला–बेभान अवस्थेत तुटक तुटक बोलतो.) असं नको म्हणूस, सावळ्या ! जागवायची गरज काय तुझ्यासारख्या वीरांना ? सावळ्या, तुझं शौर्य बघून–साऱ्या महाराष्ट्रातील लेकरं-शूर होतील.

सावळय : शंभू-ऊठ ना-एकदा तरी-तुझा पोवाडा म्हण !

शंभू : पोवाडा-आता पुढल्या जन्मी, सावळ्या ! आता-प्राण एकवटून एवढंच म्हणतो- (कसाबसा)

**शिवराया – तव चरणी ठेवी – शंभू शाहीर प्राण ।**
**गाईन–गाईन राजाचं गुणगान ! गाईन–**(प्राण सोडतो.)

सावळ्या : शंभू –(थांबून) शंभू–तुझ्यासारख्या गाणाऱ्या बुलबुलाचा ज्यांनी प्राण घेतला, त्याचा सूड घेतल्याशिवाय हा सावळ्या कधीच राहायचा नाही. (त्याच्या पाठीमागे फिरंगी सैनिक उभे)

फि.कप्तानः या मुलावर लक्ष ठेवा. हा सगळयांत धोकेबाज दिसतोय् !

फिरंगी १ : कप्तानसाहेब, आपल्या जहाजाला भोक पडलंय्, त्यासाठी काय करायचा हुकूम आहे ?

कप्तान : आपल्या जहाजाला भोक पडलंय्, एवढंच ना ? पण हे जहाज तर धड आहे ? या जहाजाला आपलं जहाज दोरीनं बांधा अन् ते माजगावच्या खाडीच्या किनाऱ्याला लावा. तिथ त्याची डागडुजी करून मग आपण पुढं जाऊ.

फिरंगी : जसा हुकूम, कप्तानसाहेब. पण त्या आणि या जहाजावरचे कैदी–आणि जहाजावरची लूट–जहाज दुरुस्त करताना हे सगळं कुठं ठेवायचं ?

कप्तान : तो एक प्रश्नच आहे. त्यातनं वेळ रात्रीची. जीजस, तूच यातनं मार्ग दाखव. (क्षणभरानं) जीजसनं मार्ग दाखवला, तांडेल.

फिरंगी : कुठला ?

कप्तान : माजगावच्या खाडीजवळ पाव मैलांवर रोमन कॅथालिक चर्च आहे. त्या चर्चमध्ये आजची रात्र या कैदयांना ठेवू. रात्रभरात आपलं जहाज दुरुस्त होईल. सकाळी रस्त्याला लागू.

फिरंगी : या सगळयांना चर्चमध्ये ठेवायचं - लूट देखील तिथंच ठेवा-यची ! हे धोक्याचं तर नाही ना ?

कप्तान : धोका कसला ? हे लोक लूट घेऊन थोडेच पळून जाणार आहेत ? आपले पहारेकरी असणारच चर्चेवर. डोळयांत तेल घालून पहारा करा, म्हणावं, कोणी बाहेर पडताना दिसला, तरी त्याला जागच्या जागी गोळी घाला.

फिरंगी : जसा हुकूम, कप्तानसाहेब.

कप्तान : आम्ही गावातल्या खानावळीत आहोत. जहाजाची दुरुस्ती झाली, की लगेच कळवा.

फिरंगी : जसा हुकूम, साहेब.

## प्रवेश दुसरा

[रोमन कॅथॉलिक चर्चचा आतला भाग. कैदयांना आत आणण्यात येत आहे. त्याचबरोबर लुटीची पेटी देखील आत आणली जात आहे.]

फिरंगी : (कैद्यांना) चला लौकर ! जल्दी जल्दी ! वळ काढू नका—चला त्या कोपऱ्यात........ (सावकाश आत जाणाऱ्या कैद्यांना चाबूक मारतो.) चला लौकर ! चलता, की नाही ?

[कैद्यांमधल्या एका बाईला—जनाबाईला चाबूक मारतो. ती खाली कोसळते.]

जनाबाई : मेले, रे, बाबा मेले—

फिरंगी : उठतस, की नाही ? का वाजवू आणखी ?

[चाबूक उगारतो. पण सावळ्या त्याचा हात मागच्या मागेच धरून ठेवतो.]

सावळया : शरम वाटते का बाईमाणसावर हात उगारायला ? हरामजादया, ती तुझ्या आईसारखी -

फिरंगी : तिची बाजू घेतोस काय ? थांब - तुला शिकवतो -

[ त्याच्यावर तुटून पडतो. दोघांची झटापट होते. इतक्यात तिसरा फिरंगी धावत येतो. सावळ्याचा नाईलाज होतो. दोघे मिळून त्याला तुडवू लागतात. ]

फिरंगी १ : थांबा - कैद्यांचे हाल करायचा हुकूम नाहीये. सोडून दया त्याला.

जनाबाई : औक्षवंत, हो, बाळा - तुला एकट्यालाच माझी दया आली.

फिरंगी १ : लुटीची पेटी आणली ?

फिरंगी ४ : होय, साहेब, ही काय -

फिरंगी १ : भलतीच किमती लूट आहे हिच्यात ! एवढा मोठा खजिना आजवर कधीच हाती लागलेला नाही !

[चर्चचा वृद्ध पाद्री घाईघाईने येतो.]

पाद्री : काय चालवलंय् तुम्ही हे ?

फिरंगी १ : काही नाही, फादर, आम्ही रात्रीपुरते या चर्चमध्ये तुमच्या आश्रयाला आलो आहोत. ( आतून किंकाळ्यांचे, विव्हळण्याचे आवाज )

पाद्री : ( संशयाने ) आश्रयाला ? कशासाठी ? हे कोण लोक आहेत ? या कसल्या पेटया आहेत?

फिरंगी, : त्या चौकशा करायचं तुमचं काम नाही, फादर. मुकाटयानं प्रभूची प्रार्थना करा आणि घरी जाऊन झोपा.

पाद्री : मला माझी जबाबदारी टाळता येणार नाही. हे चर्च माझ्या ताब्यात आहे. इथं काय घडतं, हे मला समजायलाच हवं.

फिरंगी १ : ठीक आहे. मग नीट ऐका. आमच्या क कुर्ला प्रांतातनं हे लोक पकडून आणलेत.

पाद्री : कशासाठी ?

फिरंगी : त्यांना गुलाम म्हणून विकायचं आहे !

पाद्री : गुलाम ? होली जीजस् ! प्रभूनं माणूस स्वतंत्र म्हणून निर्माण केला - तो गुलाम म्हणून विकण्यासाठी ?

फिरंगी : तुमचं प्रवचन ऐकायला आता वेळ नाही आम्हांला. हे आपले कैदी आहेत. त्यांना एक रात्र इथं ठेवायचं आहे.

पाद्री : आणि त्या पेट्या कसल्या आहेत ?

फिरंगी १ : ती कुर्ला प्रांतात केलेली लूटमार आहे !

पाद्री : लूटमार ? कैदी ? हे सारं इथं ठेवता येणार नाही. हा तुरुंग नाही - हे देऊळ आहे - देवाचं घर आहे.

फिरंगी १ : यांना इथं आसरा दिलाच पाहिजे, असा कप्तानाचा हुकूम आहे !

पाद्री : चर्चमध्ये हुकूम चालतो, तो ईश्वराचा ! तुमच्या कप्तानाचा नाही !

फिरंगी : वेड्यासारखं बोलू नका, फादर ! तुम्ही आमच्या जातीचे आहात. हे लोक काफिर आहेत ! शिवाजीची प्रजा आहे ही. ते तुमचे दुश्मन आहेत.

पाद्री : मी त्यांचा नाही आणि तुमचाही नाही, बेटा ! ईश्वराकडे जाती, धर्म काही नसतात. सगळी त्याचीच लेकरं - सगळी त्याला सारखीच असतात. या माणसांचं काम, एवढंच माझं कर्तव्य ! जे स्वतःच्या स्वार्थासाठी माणसांना छळतात, ते सगळे माझे दुश्मन !

फिरंगी १ : तुम्हांला म्हणायचंय् काय, फादर ?

पाद्री : तुमच्या कप्तानानं चालविलेली ही चाचेगिरी, ही लूटमार, ही माणसांची गुलामगिरी - ही ईश्वराला मान्य नाहीये. मी ईश्वराचा नोकर आहे - मी तुम्हांला माझ्या चर्चचा असा वापर करू देणार नाही.

फिरंगी १ : सहज करता येत नसेल, तर सक्तीनं करावा लागेल.

पाद्री : माझ्या जिवात जीव आहे, तोवर मी हे होऊ देणार नाही.

फिरंगी १ : बाजूला हो ! फुकट मरशील !

पाद्री : फुकट मरणार नाही मी ! माझं मरण देवाकडे रुजू होईल.

फिरंगी १ : मग हो तर मरायला तयार !

[तलवार उगारून त्याच्यावर धावून जातो. पाद्री तलवारीचे वार चुकवतो. दोघांची जंगी झटापट होते. शेवटी फिरंग्याच्या हातची मूठ वळवून पाद्री त्याला तलवार खाली टाकायला भाग पाडतो. तो ती टाकतो. पाद्री ती उचलतो.]

पाद्री : माझ्यासारख्या निःशस्त्र म्हाताऱ्यावर तू शस्त्र उचललंस. पण चांगलं काम करणाऱ्याच्या मागं देवाची सगळी शक्ती उभी असते, हे तू विसरलास! मी आता तुला या तलवारीनं ठार मारू शकतो. पण देवाची माणसं शस्त्राचा वापर प्राण घेण्यासाठी करीत नाहीत. दीन-दुबळयांच्या रक्षणासाठी करतात. शिवाजी महाराज तेच करतात. म्हणून ते आम्हांला आपले वाटतात आणि तुम्ही आपले असून परके वाटता, उचल! घे तुझी तलवार!

[तलवार फेकून देतो. तत्क्षणी पाठीमागून दोन फिरंगी त्याला पकडतात.]

फिरंगी १ : बस्स ! थांबली तुझी वटवट? चला, रे, दोरीनं याचे हातपाय करकचून बांधून टाका. मी मधून मधून येऊन ठेवीन लक्ष त्याच्यावर. (दोघे फिरंगी पाद्रीबाबाला खांबाला बांधून ठेवतात.) पहारा अगदी चोख आहे ना ?

फिरंगी २ : होय, साहेब. हे चर्च एखादया किल्ल्यासारखं भक्कम आहे. त्याला फक्त चारच मोठया खिडक्या आणि एकच दरवाजा आहे. सगळया—चारीच्या चारी खिडक्यांवर आम्ही पहारा बसवला आहे आणि...

फिरंगी १ : प्रमुख दरवाज्यावर मी स्वतःच पहारा करतोय्.

फिरंगी ३ : तेव्हा मुंगीला सुद्धा आपली नजर चुकवून बाहेर जाता येणार नाही, की आत येता येणार नाही-

फिरंगी १ : जा-पहाऱ्यावर जा-रात्र बरीच झालीय्. (दोघे फिरंगी जातात.) पाद्रीबाबा, आता बसा इथच-प्रार्थना करीत !

पाद्री : जरूर करीन, बेटा ! प्रभूनं तुला चांगली बुद्धी दयावी, म्हणून ! (आतून विव्हळण्याचे, कण्हण्याचे आवाज येतात.) आणि त्या निरपराधी जिवांना सोडवावं, म्हणून....

फिरंगी १ : (हसून) तुम्हांला काय वाटतं ? तुमची प्रार्थना ऐकून प्रभू त्या तीस माणसांना सोडवील ?

पाद्री : माझा प्रभूवर भरवसा आहे.

फिरंगी १ : असून उपयोग काय? तुझा प्रभूदेखील आत येऊ शकणार नाही. इतका आमचा पहारा कडक आहे.

पाद्री : (हसून) मग आतल्याच कुणाच्या तरी रूपानं यावं लागणार त्याला.

फिरंगी १ : थेरड्या ! (तलवार उपसून) तुझी ती वळवळ करणारी जीभ छाटून टाकावी, असं फार वाटतं-पण मला स्वतःचे हात खराब करायचे नाहीत, मी जातो. मधून मधून येईन. माझ्याकडे चालबाजी केलीस, तर याद राख ! जातो.)

[पाद्री प्रार्थना करू लागतो. इतक्यात सावळ्या येतो.]

सावळ्या : पाद्रीबाबा....

पाद्री : ( डोळे उघडून ) बेटा, तू ? प्रभूनंच मला हाक मारल्यासारखं वाटलं.

सावळ्या : पाद्रीबाबा, इथं काही औषधी पालापाचोळा मिळेल का ?

पाद्री : पालापाचोळा नाही - पण थोडं बाटलीतलं विलायती औषध मिळेल त्या पलिकडच्या कपाटात. फार लागलंय का तुला ?

सावळ्या : माझ्यासाठी नव्हतो विचारत, पाद्रीबाबा. तुमच्यासाठीच, कितीतरी ठिकाणी लागलंय तुम्हांला.

पाद्री : वेड्या, माझी कसली काळजी करतोस ? औषध फार थोडं आहे, बेटा - अडीअडचणीला उपयोगी पडावं, म्हणून आणलेलं. त्या तीसजणांना ते पुरणं कठीण आहे. मुलांना - बायकांना- वृद्धांना ते आधी लाव.

सावळ्या : जानकू - शंकऱ्या ( दोघां तांडेलांना बोलावतो. ते येतात. त्यांच्याबरोबर सुभानजी आणि तुकोजीही येतात. ) पाद्रीबाबा सांगतात, त्या कपाटातलं औषध जे जखमी आहेत, त्यांना लावायला हवं - काहींची बिचाऱ्यांची अवस्था तर अगदीच वाईट आहे.

[पाद्री त्यांना समजावून देऊ लागतो. तांडेल ऐकून घेतात आत जातात.]

तुकोजी : काय सांगू, सुभानजी, प्रसंग मोठा बिकट आला आहे. यासाठी म्हणत होतो, नको हे साहस ! या आठ जिवांना टाकलं ना आपण संकटात !

सुभानजी : असं कसं म्हणतोस, तुकोजी ? साहस अंगाशी आलं, म्हणून असं वाटतं तुला ! नाहीतर या आठांबरोबर उरलेल्या बावीसांनाही सोडवलं नसतं का आपण? शिवाय सरकारी लूट····

तुकोजी : पण आता आपण सगळेच गुलाम म्हणून विकले जाऊ. पुन्हा आपला मुलूखच दिसायचा नाही ! परक्या मुलुखात गुलाम म्हणून जाण्यापेक्षा मी तर वाटेतच प्राण देईन !

सुभानजी : आशा सोडू नकोस, तुकोजी. अजून काहीतरी चमत्कार होईल.

तुकोजी : अजून-म्हंजे फिरंग्यांचं जहाज दुरुस्त होईपर्यंत ! तोवर कुठून तरी कुमक आली, तरच ! नाहीतर प्रसंग मोठा कठीण आहे.

सुभानजी : कुमक कुठून येणार? इथनं पळायचाच काही मार्ग सापलडा, तर

तुकोजी : पळायचा मार्ग - पळायचे सगळे मार्ग बंद आहेत! काय करू . ? सुभानजी, निदान चिलीम तरी हवी होती ओढायला. जीव अगदी वेडा झालाय् !

सुभानजी : या भलत्या प्रसंगात तुला चिलीम कसली ओढावीशी वाटते ?

तुकोजी : वाटते खरी ! मरायचंच, तर निदान त्या आधी चिलीम तरी ओढावी !

सुभानजी : सावळ्या-तुला सुचतोय् का काही मार्ग इथनं पळायचा ?

सावळ्या : मघापासून सगळीकडे हिंडून तेच शोधतोय् ! पण पळून जायला उपयोगी पडेल, अशी एकही वस्तू दिसत नाही ! सगळं चर्च रिकामं आहे ! पलीकडे पडलेल्या त्या जुन्या वाळलेल्या लाकडांखेरीज दुसरी एक वस्तू नाहीये इथं.

तुकोजी : या पाद्रीबाबांना तरी विचार –

सावळ्या : विचारलं .... त्यांनाही काही सुचत नाही.

तुकोजी : त्यांना सोडायचं का ?

पाद्री : नको-नको ! पहारेकरी कधी आत येतील, त्याचा नेम नाही !

तुकोजी : म्हणजे, आपल्या हातांत आता काहीच नाही ! नुसती वाट बघायची ! गुलाम म्हणून त्यांच्या जहाजावर नेतील, त्या वेळेची.

सावळ्या : तुकोजी, तुमच्यापाशी चकमक आहे का, हो ?

तुकोजी : छे, रे, सावळ्या, कसली चकमक घेऊन बसला आहेस ! खरं तर चिलीम हवीच होती, रे, आता –

सावळ्या : शंकऱ्या ! (शंकऱ्या येतो.) चकमक आहे का विचार कोणाकडे आणि दोघाचौघांना इकडे पाठवून दे –

सुभानजी : काय विचार आहे, सावळ्या, तुझा ?

सावळ्या : तुम्हांला पटतो का, बघा. (दोघे-चौघेजण येतात.) आपण एकंदर तीसजण आहोत. पण आपल्याला फक्त स्वतःची सुटका करायची नाहीये, आपल्या प्रांतातून फिरंग्यांनी लुटून आणलेल्या जडजवाहिऱ्यांची ही पेटी इथं आहे, तीही न्यायची आहे.

एकजण : ते सगळं खरं - पण बाहेर कसं पडायचं ?

सावळ्या : पाठीमागची खिडकी एकदम सात-आठ जणांनी धडक देऊन उखडून काढायची - पहिल्यांदा बायका-मुलांना सुरक्षित बाहेर घेऊन महाराजांचा हा ठेवा आधी बाहेर काढायचा.

दुसरा : पण खिडकीबाहेर पहारा आहे, त्याचं काय ?

सावळ्या : हां - तीच तर महत्त्वाची अडचण आहे. पहाऱ्यावरची सगळी माणसं पुढच्या दाराशी येतील, असं करायचं. ते माझ्याकडे लागलं.

तुकोजी : काय करणारेयस तू?

जनाबाई : ( आत येऊन ) ही घ्या चकमक - कोणाला हवी होती? मला सवय आहे घराबाहेर पडताना कनवटीला चकमक लावायची.

सावळ्या : जनाबाई, तुमचे मोठ्ठे उपकार आहेत आम्हां सर्वांवर.

सुभानजी : ही चकमक घेऊन काय करणारेयस्?

सावळ्या : आग लावणारेय्!

तुकोजी : आग?

सावळ्या : हो - पलीकडे ती कोरडी लाकडं आहेत ना, ती देऊ पेटवून. 'आग आग' असा ओरडा झाला, की आपला माल वाचवण्यासाठी पहारेकऱ्यांना या दाराशी धावत यावंच लागेल. होय, की नाही?

तुकोजी : ( विलक्षण आनंदानं ) शाब्बास, रं, माझ्या मर्दा! अशी नामी युक्ती काढलीस!

एकजण : पण काम लई धाडसाचं हाय!

तुकोजी : मग धाडस करणार, का रडत बसणार आणि गुलाम म्हणून परक्या देशाला विकलं जाणार?

दुसरा : पन पहारेकऱ्यांजवळ बंदुका हायेत. पळताना बघितल, तर जागच्या जागी टिपतील, न्हवं? उगा प्राण गमवावा लागंल.

तुकोजी : थूत तुमच्या जिनगानीवर, मरद कसं, रे, म्हणायचं तुम्हांला? गुलामगिरींपरीस तुम्हांला प्राणाचं मोल अधिक वाटतं, होय, रं! हा कोवळा पोरगा.... तुम्हां सगळ्या लोकांना गुलामीतनं सोडवण्यापायी जिवावर उदार झाला अन् तुम्ही भित्री भागूबाईपणा करताय्!

जनाबाई : नाय नाय, तुकोजीबाबा. आपलं सगळ्यांचं काय होणार असेल, ते होऊ दे....पण आपण इकडून सुटून जायचं.

सगळे : हो हो-आपण इकडून पळून जायचं!

तुकोजी : शाब्बास, माझ्या वीरांनो! अशी हिंमत पाहिजे!

सुभानजी : तुकोजी, आपण गेल्याबद्दल आपल्या मागं या पाद्रीबाबांचा छळ होईल! त्यांना सोडवून आपण आपल्याबरोबर नेऊ या.

पाद्री : नाही, माझ्या दोस्तांनो, तुम्ही सुखरूप बाहेर पडेपर्यंत आरडा-ओरडा करून त्या पहारेकऱ्यांना इथं थोपवायला कुणीतरी माणूस हवा ना?

सावळ्या : मी थांबायला तयार आहे, पाद्रीबाबा - पण तुम्ही जा!

पाद्री : बेटा, तू लहान आहेस. अजून सारं आयुष्य तुझ्यापुढे आहे. माझं आता काय राह्यलंय्? मी आनंदानं मरेन!

सावळ्या : पण, पाद्रीबाबा - आग लागल्यावर सबंध चर्च पेटलं, तर..?

पाद्री : तर त्याबरोबर मलाच जळून जायला हवं, माझ्या पोरा! माझ्यावर या चर्चची जबाबदारी आहे! चर्च जळू देऊन मला कसं जिवंत राहता येईल?

सावळ्या : मग, पाद्रीबाबा, चर्चची जबाबदारी तुमच्यावर असताना आम्ही इथं ही आग लावली, तर चालेल?

पाद्री : चालेल, बाबा. कदाचित आग पसरायची नाही - कदाचित पहारेकरी ती विझवतील, पण कदाचित - कदाचित ती पसरेल आणि चर्चबरोबर मी सुद्धा जळून जाईन. प्रभूच्या मनात असेल, तसं होईल. पण तीस माणसं गुलामीत खितपत पडण्यापेक्षा आपलं घर जळलेलं चालेल देवाला! तुम्ही जा, बेटा, माझा आशीर्वाद आहे.

[क्षणभर शांतता. मग– ]

सुभानजी : खिडकी थोडी उंच आहे! सगळे चढून कसे जाणार?

सावळ्या : इथं शिडी नाही - घोडा नाही! चढून कसं जाणार? (टाळीवाजवून) हात्तिच्या, हवी कशाला शिडी? आपण आहोत की!

सुभानजी : म्हंजे?

सावळ्या : म्हंजे माणसांची शिडी करायची. ही अशी –

[दोन माणसांना समोरासमोर उभं करतो. त्यांनी खाली धरलेले

हात–मग वर धरलेले हात–पुन्हा त्यांच्या खांद्यांवर दोन माणसं या पद्धतीनं शिडी करून सावळ्या खिडकीपर्यंत चढून जाऊन दाखवतो. ]

सगळे : हर हर महादेव !

[ अचानक फिरंगी १ येतो. ]

फिरंगी १ : काय, रे, कसली गडबड चाललीय् ?

[ सगळे घाबरून एकमेकांकडे पाहू लागतात. ]

सावळ्या : नाही, साहेब - हे लोक आहेत ना - त्यांना झोप येत नाही ! म्हणून ते गाणी म्हणताहेत.

फिरंगी १ : गाणी ? मग असे काय उभे आहेत ?

सावळ्या : गाणी म्हणताना नाच करताहेत !

फिरंगी १ : नाच ? मी नाही पाहिला कधी असला नाच !

सावळ्या : मग पाहा तर आत्ताच.

फिरंगी १ : मला नाही पाहायचा !

सावळ्या : पाहा तर खरं - तुम्हाला भयंकर आवडेल.

फिरंगी १ : मीही पाहणार नाही आणि रात्रीच्या वेळेस तुम्हांलाही नाचू देणार नाही.

सावळ्या : असं नका करू, साहेब, नाच धर्माचा आहे. आमचे सगळे सण.... नाचतो आम्ही त्यांत.

फिरंगी १ : ठीक आहे, करा नाच.

सावळ्या : चला, रे - साहेबांना एकदम खूश करून टाकू. करा सुरू. बोला श्रीशिवाजी महाराज की जय ! हर हर महादेव !

[ या इशाऱ्यासरशी पळून जाण्याच्या तयारीला सुरुवात होऊ लागते. ]

**चला, चकमक चकमक पेटवा**
**दिवस सणाचा गोड करावा ।**

आला, श्रावण अष्टमी काल्याची
बघा खिडकीत शिंकाळी दह्याची
कसा पोचेल तिथवर हात
करा उतरंड सवंगड्यांची

[खिडकीशी माणसांची शिडी करतात.]

राहा, गड्यांनो, आता हुश्श्यार!
बेत ठरलेला, पाडावा पार
दिवस सणाचा गोड करावा !!
भाद्रपदात गणपती आले
घराघरांत मखरी बसवले

[फिरंगी १ नको-नको म्हणत असताना त्याला लुटीच्या पेटीवर बसवतात, आणि त्याच्यासकट पेटी खिडकीशी आणून ठेवतात.]

नेलं वाजत गाजत त्यांना
पूजा–आरती करून भजले

[आरतीमधून इशारा देत]

जन्या-शंकऱ्या रे – तू ने वाहून, रे
प्रसाद लुटीचा जाई घेऊन, रे
पोचवलं पाण्यातून गावा
दिवस सणाचा गोड करावा ॥

[फिरंगी कसाबसा सुटका करून घेतो.]

पुढं दसरा सरा नेटानं
आली दशमी विजय घेऊन
देवळाला डावीकडं वळसा

दिवाळीला जहाजात बैसा
दिवाळीचा महिमा आला ध्यानात ?

[परत ठासून सांगतो]

देवळाला डावीकडं वळसा
दिवाळीला जहाजात बैसा
तोवरती आम्ही करू खास
दिवाळीच्या दिव्यांची आरास
येऊ लगबग, भरोसा ठेवा
दिवस सणाचा गोड करावा ॥

[त्यांच्यापासून काही धोका नाही, अशी खात्री होऊन फिरंगी १ बाहेर जातो. भराभर कामाला सुरुवात होते.]

चला, चकमक चकमक पेटवा
दिवस सणाचा गोड करावा ॥
करा धुळवड शत्रूची बेदम
खेळा रक्ताच्या रंगानं पंचम
एकजुटीने करून टोळी
आता धडाड पेटवू होळी ।

बोला, हर हर महादेव !

[सावळ्या धावतच लाकडांपाशी जातो आणि ती पेटवून पळत येतो.]

पाद्री : (ओरडतो) आग-आग ! धावा धावा ! चर्चला आग लागली – धावा धावा !

[सगळे पहारेकरी धावत येतात.]

पहारेकरी : काय झालं ? काय झालं ?

पाद्री : मला सोडवा – आग लागली – चर्चला आग लागली – मला सोडवा !


प्रभाशंकर
कवडी

फिरंगी १ : तुला सोडवत बसायला वेळ नाही. तू मर इथंच.

[धावत आगीच्या दिशेनं जातो. त्याच्या पाठोपाठ इतर. एका बाजूला धडाडून पेटलेली आग. प्रचंड धूर. त्यातून आग विझवण्याचा प्रयत्न करीत धावणारे पहारेकरी. दुसऱ्या बाजूला माणसांची शिडी करून खिडकीबाहेर पडण्याचा प्रयत्न करणारे मराठे. मालाची पेटी देखील बाहेर नेली जाते. मध्यभागी, जळत्या चर्चमध्ये शांतपणे प्रार्थना करणारा पाद्री.]

* पडदा *

## अंक तिसरा

## प्रवेश पहिला

[कुलाब्यातील सरूच्या खानावळीचा बाहेरचा भाग. तुकोजी ओरडत ओरडत येतो.]

तुकोजी : सरूबाई—अग कमळे—सरू—अग, लौकर लौकर बाहेर या! मोठ्ठी बातमी आणलीय् तुमच्यासाठी! सरू, अग, ए सरू—

[सरू पदराला हात पुशीत बाहेर येते. तिच्या मागे कमळजा.]

सरू : आले, आले-मेले नाहीये मी—माझ्या नावानं अशी बोंब ठोकायला.

कमळजा : बाई, बाई, तुकोजीबाबा, किती दिवसांनी आलात!

तुकोजी : बघ ना-इतक्या दिवसांनी आलो आणि तुझी आई बघ कसं स्वागत करतेय् ते! चिलीम द्यायची, फराळ वाढायचा, ते राहिलं कुठंच!

सरू : हो —बसते आता फराळ वाढत. हातचं काम सोडून बाहेर यायला लावलंत, ते गेलं कुठंच! आणि काय, हो, तुकोजीबाबा? हात मोडल्यापास्नं इथं वाड्यावर येऊन चाकरीला राहिलात, म्हटलं, हा तरी खलाशी निवळला! तर तुम्हांलाही दुर्बुद्धी आठवली ना परत पाण्यावर जायची! मेले, हे खलाशी कधी सुधारायचे नाहीत. एकदा यांना पाण्याची चटक लागली, की मग ती कायमची!

कमळजा : (उत्सुकतेने) कसली बातमी आणलीयूत? दादाचीच ना?

सरू : कार्टे, त्या उंडग्या पोराचं नाव घेऊ नकोस, म्हणून सांगितलं तुला हज्जारदा? आता तो आपल्याला मेला! काय चांडाळाचं धारिष्टय तरी! एवढ्या लहान वयातच बापाच्या वळणावर गेला!

तुकोजी : हां हां, सरू–त्याला लहान समजू नकोस. भलताच मोठा शूर वीर आहे बरं तो!

कमळजा : लौकर सांगा ना, बाबा, दादाचा पराक्रम!

तुकोजी : अग, फिरंग्यांनी कुर्ल्यामधनं पकडून नेलेलो माणसं सोडवायला आम्ही जहाज घेऊन गेलो आणि माजगावच्या खाडीत फिरंगी आरमाराशी आमची गाठ पडली!

कमळजा : अगोबाई–मग?

तुकोजी : तुझ्या दादानं अशी तोफ डागली, की त्यांच्या जहाजाला मध्या-वरच भोक पडलं!

कमळजा : (टाळ्या वाजवून) हे.... शाब्बास!

तुकोजी : पण तसलं फुटकं जहाज आमच्या जहाजाजवळ आणून त्यांनी केली हातघाईला सुरुवात. आमचा ही पराक्रम कमो नव्हता–पण माणसंच कमी पडली. फिरंग्यांनी आम्हांला कैद केलं.

कमळजा : अग आई, ग! असं कसं झालं?

तुकोजी : जहाज दुरुस्त होईपर्यंत फिरंग्यांनी आम्हांला माजगावच्या चर्चमध्ये ठेवलं....बरोबर महाराजांची लूट!

कमळजा : मग?

तुकोजी : मग सावळयानंच युक्ती काढली. एका बाजूला आग पेटवली· फिरंग्यांची एकच त्रेधा उडाली - जहाज दुरुस्त करणारी मंडळी देखील आग विझवायला धावत आली. आम्ही सगळे आपल्या जहाजावर गेलो. लुटीचा परत मिळवलेला माल तिथं ठेवला. आणि फिरंग्यांच्या जहाजावर गेलो. तिथला सगळाच्या सगळा दारूगोळा नि एकशेआठ बंदुका उचलल्या आणि वर ते जहाज

बुडवून टाकलं. श्री शिवाजी महाराज की जय ! असा घोष करून आम्ही तिथनं निघालो कधी, हे फिरंग्यांना कळलंही नाही. पोरी, हा सगळा पराक्रम तुझ्या दादाचा बरं, सरू ...तुझा पोर जर आता तिथं नसता, तर आम्ही गुलाम होऊन कुठं खितपत पडलो असतो, कुणास ठाऊक !

कमळजा : दादा इथनं गेला, तेव्हा मी किती रडले ! पण मला खात्रीच होती, तो पराक्रम गाजवील, याची !

तुकोजी : अग, सरू, तुझ्या सावळ्यानं कुळाचं नाव उद्धरलं ! कुल्याच्यां सुमंतानं सगळी हकीकत पत्रानं पंत-सचिवांना कळवली. आणि त्यांनी प्रत्यक्ष महाराजांच्या कानांवर घातली.

कमळजा : काय, म्हणता काय, तुकोजीबाबा ?

तुकोजी : महाराज कधी गुण ओळखल्याशिवाय राहत नाहीत, हो ! लगेच शंभर मोहरांचं इनामपत्र दिलं सावळ्याला ! वर आणखी मायनाक सरदाराच्या आरमारावर तांडेलाची असामी !

कमळजा : ( आनंदानं नाचत ) सावळ्या तांडेल ! सावळ्या तांडेल !

सरू : हे बघा, तुकोजीबाबा, त्या कार्ट्याला इनाम मिळालं काय आणि मोठ्ठी सरदारी मिळाली काय, मला अगदी सांगू नका ! मी जाते माझ्या कामाला. ( जाते. )

कमळजा : बाबा, दादानं एवढं नाव कमावलं - पण आईला त्याचं जरासुद्धा कवतिक नाही !

तुकोजी : कष्टी होऊ नकोस, बेटा ! दगडालाही पाझर फुटल्याशिवाय राहत नाही.

[ सावळ्या येतो. ]

कमळजा : दादा - दादा ( धावत जाऊन त्याला मिठी मारते. ) तुला कधी एकदा भेटेनसं झालं होतं.

तुकोजी : सावळ्या, तू कसा आलास ? मायनाक सरदारानं तुला सोडलं कसं ?

सावळ्या : नव्हतेच सोडत. पण, तुकोजीबाबा, आता मी तांडेल झालो. नव्या कामगिरीवर जाताना आईच्या पायांवर डोकं ठेवावं आणि तिचा आशीर्वाद घ्यावा, म्हणून आजच्यापुरती रजा मागितली.

तुकोजी : काय सांगू सावळ्या – आशीर्वाद घ्यायला जाशील आणि शिव्याशाप ऐकायला मिळतील ! तेव्हा तू आईला भेटायला मुळीच जाऊ नकोस !

कमळजा : खरंच, दादा – आई अगदी वाईट आहे !

सावळ्या : असं नाही बोलायचं, कमळे ! ती कशी का असेना, माझी आई, म्हणून मला ती आवडतेच ! पण, तुकोजीबाबा, तुम्ही सांगत असाल, तर मी इथूनच तिला हात जोडीन आणि परत जाईन.

कमळजा : हे काय, दादा, लगेच परत जाणार तू ?

सावळ्या : एक काम कर, कमळे – या शंभर मोहरा घे ! (कमरेचा कसा देत) मला इनाम मिळालेल्या. माझ्या इनामपत्रांचा तिला काहीच उपयोग नाही. पण या शंभर मोहरा तिला नक्कीच कामी येतील.

[एकजण कुबडी घेऊन् झपकन येऊन त्यांच्या अंगावरून जाऊ लागतो – हा मुरारी.]

तुकोजी : थांबा–कोण, रे, तो ?

मुरारी : मी मुरारी–लंगडा मुरारी.

तुकाजी : वाडा सोडून बाहेर कुठं गेला होतास ?

मुरारी : (चाचरत) खाडीत–गेलो होतो जरा–

तुकोजी : कशासाठी ?

मुरारी : नाही–तसा लांब गेलो नव्हतो–

तुकोजी : पण बाहेर का गेलास ?

मुरारी : असाच–पाय मोकळे करायला–

तुकोजी : का ? वाड्यात जागा नाही ?

मुरारी : आहे–पण–मी––

तुकोजी : आहे, मग वाड्याबाहेर जाण्याचं कारण काय ? हुकुमाशिवाय रोग्यानं वाड्याबाहेर जायचं नसतं, हे तुला ठाऊक नाही का ? पुन्हा गेलास, तर वाड्यातून चालतं व्हावं लागेल, हे लक्षात ठेव. जा आता.

[मुरारी जाऊ लागतो, इतक्यात जनाबाई येते. तिला पाहताच मुरारी क्षणमात्र थबकतो. मग घाईघाईने निघून जातो.]

जनाबाई : हा आता गेला, हा कोण ?

तुकोजी : रोगीवाड्यातला रोगी आहे हा. महाराजांच्या लष्करात आहे. पायाला दुखापत झालीय्, म्हणून इथं येऊन राहिलाय्.

जनाबाई : कधीपासून ?

तुकोजी : झाला महिनाभर. पण तुम्ही असं का विचारता, जनाबाई ?

जनाबाई : नाही. पाहिल्यासारखा वाटला. माणसासारखी माणसं असतात, म्हणा --

तुकोजी : पण, जनाबाई, तुम्ही कशा काय आज इकडं फिरकलात तुमची चेऊलची खाडी सोडून ?

जनाबाई : यालाच भेटायला आले. यानं त्या दिवशी एवढ्या मोठ्या संकटातनं वाचवलं, त्या उपकारांची फेड जन्मात व्हायची नाही. पण माझी एक आठवण, म्हणून हे दयायला आले.

सावळ्या : काय आणलंत, जनाबाई ?

जनाबाई : सहा-सात वर्षांपूर्वी वादळात आमचं जहाज बुडालं. मी कशी-बशी किनाऱ्याला लागले. पण घरधनी त्या वादळात गेले ते गेलेच ! इतकी वर्षं त्यांची आठवण म्हणून या वस्तू ठेवलय होत्या, त्या तुला भेट म्हणून देतेय्. आता घरधनी परत यायची आशा नाही. तुझ्यासारख्या शूर तांडेलालाच त्याचा उपयोग ! (वस्तू देते. एक दुर्बीण आणि एक होकायंत्र.)

सावळ्या : काय आहे हे ?

तुकोजी : ही दुर्बीण. बघ बरं हिच्यातून. (सावळ्या बघतो, बघ – लांबचं झाड जवळ आलं, की नाही? समुद्रावर जहाज बघायला ही उपयोगाची!

सावळ्या : (थक्क होऊन) काय चमत्कार आहे या दुर्बीणीचा! (होकायंत्र दाखवून) आणि हे?

तुकोजी : हे होकायंत्र. हे दिशा दाखवतं. पण, जनाबाई, या वस्तू अजून आपल्याकडे मिळत नाहीत. तुमच्याकडे या कुठून आल्या?

जनाबाई : माझे घरधनी तांडेल होते. महाराजांच्या आरमारावरच होते एका इंग्रज जहाजावरच्या तांडेलानं, त्याचा जीव वाचवल्या बद्दल त्यांना या वस्तू बक्षीस दिल्या होत्या – (डोळ्यांना पदर लावते.)

तुकोजी : (विलक्षण आनंदून) कमळे, पळत जा – माझ्या खोलीत सुभानजी नाईक बसले आहेत त्यांना घेऊन ये! पळ! (कमळजा जाते.)

तुकोजी : सावळ्या, या वस्तू – या माझ्या चांगल्या ओळखीच्या आहेत!

जनाबाई : तुमच्या कशा ओळखीच्या?

तुकोजी : काय सांगू तुम्हांला? जहाजावरून ह्या दुर्बिणीतून मी कैक वेळा शत्रूच्या जहाजाची टेहळणी केलीय्!

सावळ्या : पण तुम्हांला कुठं मिळाली ही दुर्बीण?

तुकोजी : अरे, ही आपल्या नाइकांची आहे! त्यांनाच एका इंग्रज तांडेलानं ती दिली होती!

सावळ्या : तसं असेल, तर –

[कमळजा सुभानजीला घेऊन येते.]

तुकोजी : नाईक, तुमच्या हरवलेल्या बायकोचा शोध लागला!

सुभानजी : जना – तू? तू जिवंत आहेस?

जनाबाई : होय, धनी. पण आज मी इथं दिसतेयू, ती या सावळ्यामुळं.

सावळ्या : ही दुर्बीण आणि हे दिशायंत्र – तुमचं आहे!

सुभानजी : असू दे. पण आता या वस्तू तुझ्याकडेच ठेवं. तूच त्यांना लायक आहेस. मोठा दर्यावर्दी असामी हो !

तुकोजी : आता सगळे वाड्यावर चला. मेजवानी करून सुभानजींचा हा आनंद साजरा करू. चल, कमळे, चला, जनाबाई.

सावळ्या : बाबा, मी घेऊन येतो जनाबाईंना. (बाकीचे जातात.) जनाबाई, मघा तुम्ही म्हणालात, की हा मुरारी तुम्हांला कुठंतरी पाहिल्यासारखा वाटतो. कुठं पाहिलात तुम्ही याला ?

जनाबाई : आता आठवलं. अरे, हा आमच्या वाडीतल्या भीमाबाईंच मुलगा ! बापडीला पोराचं इतकं कौतुक, पण पोरगा – अधनं मधनं येतो आणि आईशी भांड-भांड भांडतो.

सावळ्या : स्वतःच्या आईशी भांडतो ?

जनाबाई : कुठं असतो ? काय करतो ? कुणास ठाऊक ! पण नाही, रे, सावळ्या – माझी काहीतरी चूक होतेय् ! हा या वाड्यावरचा मुरारी दुखणाईत आहे ना एका पायानं ? मग हा तो कसा असेल ? त्याचे पाय तर धड आहेत ! चांगला पळताना पाहिला मी त्याला काल !

सावळ्या : चला – आपण वाड्यावर जाऊ.

जनाबाई : चल, बाळा – आजचा दिवस दिसतोय् तुझ्यामुळं. असंच दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यासाठी देव तुला दीर्घायुष्य देवो !

सावळ्या : जनाबाई – तुम्ही आशीर्वाद दिलात – म्हंजे तो आईनंच दिल्यासारखा आहे ! चला !

[दोघे जाऊ लागतात, एवढ्यात मुरारी घाईघाईनं येतो. जनाबाईकडे पाहतो. दचकतो आणि जाऊ लागतो.]

सावळ्या : तुम्ही पुढं व्हा, जनाबाई ! मी आलोच.

[धावतच मुरारीच्या मागे जातो. जनाबाई एका बाजूला उभी राहते.]

ळ्या : ( मुरारीला ओढत आणीत ) बोल - बोल ! तू कोण आहेस ?

ुरारी : ( सुटण्याचा प्रयत्न करीत ) मी - मी मुरारी आहे ! रोगीवाड्या-वरचा !

सावळ्या : खोटं बोललास, तर माझ्याशी गाठ आहे. ! तू चेऊलच्या भीमाबाईचा मुलगा, की नाही ?

मुरारी : असलो, म्हणून ?

सावळ्या : मग तुझे पाय धड आहेत ! खोटेपणा करतोस ! कुणाला फसवण्यासाठी ? ही कुबडी कशासाठी ?

मुरारी : ( सुटता येत नाही असे पाहून ) तुझ्या डोसक्यात घालण्यासाठी !

[ सावळ्याच्या डोक्यात कुबडी मारतो. तिरीमिरी येऊन सावळ्या खाली पडतो. मुरारी पळत सुटतो. पण सावळ्या उठून त्याच्यावर झडप घालतो. दोघांची झटापट होते. ]

जनाबाई : ( ओरडत पळते ) धावा, हो, धावा, - सावळ्याला मारल !

[ एवढ्यात एक माणूस कुंपणावरून उडी टाकून येतो, आणि मुरारीला सोडवण्याचा प्रयत्न करतो. सावळ्या दोघांनाही तोंड देतो. शेवटी मुरारीला गुडघ्यांत गच्च पकडून ठेवतो. मुरारीला प्रयत्न करूनही पळता येत नाही. त्याचा साथीदार मात्र पळून जातो. एवढ्यात तुकोजी, सुभानजी, कमळी वगैरे लोक जमतात.]

सावळ्या : तुकोजीबाबा - हा मुरारी लंगडा नाही ; हा लंगड्याचे सोंग घेऊन इथं वाड्यात राहतोय ! काही तरी हेतूनं ! मला संशय येतो, की हा मोगलांचा हेर आहे.

सुभान : काय रे ? खरं आहे हे !

सावळ्या : मघा जनाबाईनं आपल्याला ओळखलं, अशी त्याला भीती वाटली, म्हणून तो आत्ता वाड्यावरनं पळून चालला होता !

तुकोजी : खरं सांग, मुरारी - तू हेर आहेस, की नाही ?

मुरारी : नाही, नाही –

सावळ्या : ( त्याला एक फटका मारून ) आता खरं ते कबूल करतोस की, नाही ?

[ त्याला सगळे मारू लागतात. ]

मुरारी : मारू नका - मारू नका - मी कबूल करतो !

तुकोजी : सगळं सगळं सांग !

मुरारी : मी भीमाबाईचा मुलगा... आईनं माझे खूप लाड केले.... त्यापायीच मी कुणाला जुमानीनासा झालो....चाच्यांच्या जहाजांवर लूटमार करायला जाऊ लागलो........

तुकोजी : बस्–इतकंच ? सगळं सांग–नाहीतर तुला जिवंत ठेवणार नाही....

मुरारी : (घाबरून) सांगतो. समुद्रावरच मला मोगल आरमार भेटलं. त्यांनी मराठ्यांच्या आरमाराचा भेद काढून देणारा म्हणून ठेवलं.

तुकोजी : (त्याला लाथांनी तुडवीत) हरामखोरा, म्हणजे तू खरंच मोगलांचा हेर आहेस ! अरे, रक्ताचं पाणी करून आम्ही महाराजांचं आरमार वाढवतोय्–आणि तू डुकरा, शरम नाहीवाटत आपल्या मायदेशाशी द्रोह करायला ?

सावळ्या : चला–त्याला कोतवालाच्या हवाली करायला पाहिजे.

[कमळजा सोडून बाकीचे सगळे जातात. इतक्यात सरू बाहेर येते.]

सरू : कसला, ग, एवढा गलका झाला ?

कमळजा : आई, आई....अग, दादा आला होता !

सरू : मग ? त्यासाठी इतकी गडबड उडवून द्यायची ?

कमळजा : अग, दादानं, की नाही, मोगलांचा हेर पकडून दिला !

सरू : तू एकसारखी त्याची हुशारी सांगत बस !

कमळजा : आई, दादानं हे दिलंय् तुझ्यासाठी. (कनवटीचा कसा काढून देत ) शंभर मोहरा आहेत यात.

सरू : शंभर मोहरा ?

कमळजा : दादाला इनाम मिळालेल्या.

सरू : हे इतकी वर्षं जहाजावर गेले–पण घरी एक शिवराई पाठवली नाही आणि याला कुठून, ग, माझी आठवण झाली?

कमळजा : बघ–आणि तरी तुला वाटतं, की सगळे खलाशी वाईट!

सरू : कमळजे–मी इतकी त्या कार्ट्याला हिडीसफिडीस करते. घरात-नं घालवून देखील दिलं–आणि हा मेला–हा मेला कशाला, ग, इतकं चांगलं वागतो माझ्याशी?

कमळजा : तू त्याची आई आहेस, म्हणून?

सरू : त्या मोहरा परत केल्या-तर त्याला वाईट वाटेल. तूच ठेव त्या स्वतःपाशी. पण मी काही त्यांना हात लावायची नाही–हात लावायची नाही– (रडत रडत घरात जाते.)

कमळजा : आई–ए आई! रडायला काय झालं?

[तिच्यामागून घरात जाऊ लागणार, तोच मघा मुरारीला साथ देणारा माणूस परत कुंपणावरून उडी टाकून येतो.]

माणूस : तू- सावळ्याची बहीण ना?

कमळजा : हो–का?

माणूस : तुमचे वडील गणोबा तांडेल, घरातून निघून गेलेत ना?

कमळजा : होय, हो. तुम्हांला माहीतेय् का, ते कुठं आहेत, ते?

माणूस : आमच्याच जहाजावर आहेत. पण अतिशय बीमार आहेत.

कमळजा : बाप्पा–आजारी आहेत?

माणूस : हो. आत्ताच्या आत्ता माझ्याबरोबर आलीस, तर त्यांची भेट होईल. नाहीतर–

कमळजा : चला, मी आलेच आईला सांगून....

माणूस : अंहं, कुणाला सांगत बसलीस, तर भेट नाही. होणार ते शेवटचे क्षण मोजताहेत. प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे.

कमळजा : पण निदान दादाला तरी सांगून....

माणूस : नाही म्हणजे नाही! येतेस, की मी जाऊ?

कमळजा : येते, येते. चला लौकर. (त्याच्याबरोबर घाईघाईने जाते.)

सावळ्या : लोकांनी त्या माणसांच वर्णन केलं - तात्रडतोब मी ओळखलं, की हा मुरारीचा साथीदार. म्हंजे त्यानं तुला मोगलांच्या जहाजावर आणलं असणार. माझ्या होडक्यातून मी मघाच येऊन जहाजाच्या बाजूला चिकटून राह्यलोयू. पण त्यांची टेहळणी चालू होती. आता सगळे शीड बांधायला गेले, तेव्हा मला यायला फावलं.

कमळजा : त्यांचा तुला पकडायचा डाव आहे, दादा. तू यायला नको होतंस.

सावळ्या : आणि तुझं काय?

कमळजा : माझं काहीही झालं असतं. मी मरून गेले असते. पण तू त्यांच्या हातांत पडायला नको होतंस, दादा.

सावळ्या : आता बोलत बसण्यात वेळ घालवू नकोस, चल, आपण पाण्यात उड्या टाकू.

कमळजा : चल.

सावळ्या : पण समुद्र खवळला आहे, कमळजा. तुला भीती नाही वाटणार?

कमळजा : तुझ्यासारख्या मर्दाची मी बहीण आहे. मला कसली भीती?

सावळ्या : मग चल तर....

[दोघे पळून जाऊ लागणार, इतक्यात एक खलाशी आडवा येतो.]

खलाशी : पळून चालला काय?

[सावळ्या त्याच्याशी लढून त्याला लोळवतो. एवढ्यात आणखी दोघेजण येतात. सावळ्या त्यांच्याशी देखील लढतो. पण नंतर आणखी खलाशी येतात. तेव्हा मात्र त्याचा नाइलाज होतो. तो हरून खाली बसतो. प्रमुख तांडेल येतो.]

तांडेल : बस्स - संपली तुझी धडपड? मी तर ऐकलं होतं, की तू मोठा बहादर लडका आहेस!

सावळ्या : माझ्या बहिणीला तुम्ही इथं कशाला आणलंत? मी तिला घेऊन जायला आलोयू.

तांडेल : आमच्या मुरारीला तू पकडून दिलंस, म्हणून आम्ही तुझ्या

बहिणीला इथं आणलं.

सावळ्या : मुरारी तुम्हांला फितुर झाला. त्याला पकडणंच भाग होतं.

तांडेल : त्याला आम्ही किती पैसे दिले, ठाऊक आहे ? पाच सहस्र मोहरा, त्याच्या गद्दारीचं बक्षीस. तुझ्या बहाद्दरीचं किती बक्षीस दिलं तुला महाराजांनी ?

सावळ्या : शंभर मोहरा.

तांडेल : ( हसून ) बस्स ! एवढंच ?

सावळ्या : एवढंच· मला एकही मोहर नसती मिळाली, तरी चाललं असतं. महाराजांच्या तोंडचा शाबासकीचा शब्दही मला पुरेसा होता. बहाद्दरी पैशांसाठी करायची नसते. दुसऱ्याच्या उपयोगी पडावं, म्हणून करायची असते. त्यांनी दिलेला दुवा, हेच खरं बक्षीस.

तांडेल : पाच सहस्रांहून अधिक मोठं ?

सावळ्या : फितुरी हे पाप आहे. आणि पापाचा पैसा कधीच पचत नाही. मुरारीला पाच सहस्रांबरोबर काय मिळालं माहीतेय् ? असंख्य जिवांचे तळतळाट - शिव्याशाप - आणि शेवटी विश्रामगडावरून कडेलोटाची शिक्षा ! काय उपयोग झाला त्याला त्या पैशांचा ? माझ्यावर महाराजांची कृपा झाली, तर माझ्या आयुष्याचं सार्थक होईल.

तांडेल : त्याला आता तुला सवडच मिळणार नाही ! तुझं आयुष्य इथंच संपणार आहे.

कमळजा : तुम्ही - दादाला मारून टाकणार ?

माणूस : हो - आणि त्यानंतर तुला देखील.

कमळजा : मग मलाच आधी मारून टाका मला दादाला मारताना बघायचं नाही.

सावळ्या : पण आम्हांला मारायचं कारण ?

तांडेल : तुझी हुशारी शत्रूकडच्या हुशार माणसांना जिवंत ठेवणं धोक्याचं असतं ! तुला मरायचं नसेल, तर आमच्या बाजूनं यावं लागेल.

सावळ्या : म्हणजे काय करायचं ?

तांडेल : कुलाब्यात मराठ्यांचा खजिना कुठं ठेवलाय्, हे सांगायचं.

सावळ्या : ते मी कसं सांगणार ? मला काहीच माहिती नाही त्या खजिन्याची !

तांडेल : खोटं बोलतोस. तू आता पूर्वीचा सावळ्या नाहीस. मायनाक सरदाराचा तांडेल आहेस. तुला माहीत असलाच पाहिजे त्या खजिन्याचा पत्ता.

सावळ्या : तो सांगितला, तर तुम्ही मला जिवंत ठेवणार—नाहीतर मारून टाकणार ?

तांडेल : होय. पण, बेटा, तुझ्यासारख्या बहाद्दर मुलाला मारून टाकणं मला पसंद नाही ! मग सांगतोस ना खजिन्याचा पत्ता ?

सावळ्या : त्यापेक्षा तुम्ही मला मारूनच टाका !

तांडेल : एवढ्या लहान वयात मरण्याची तुला भीती नाही वाटत ?

सावळ्या : नाही. मी कामगिरीवर निघालो, तेव्हा मरणाची तयारी ठेवूनच निघालो.

तांडेल : तुझ्याबरोबर या छोट्या पोरीलाही मी मारून टाकणार आहे.

कमळजा : आपली मेहरबानी, साहेब ! दोघांना एकदमच मारलंत, तर आमच्यापैकी कुणीच दुःखी होणार नाही.

तांडेल : तुमच्या आईला नाही का वाईट वाटणार ?

सावळ्या : मी फितूर झालो, तर माझ्या मायभूमीला त्यापेक्षा अधिक वाईट वाटेल. आता वेळ कशाला घालवता ? टाका आम्हांला मारून !

तांडेल : ठीक आहे. घे तर देवाचं नाव !

[सावळ्या आणि कमळजा यांना शेजारी शेजारी उभं करून तिघेजण बंदुका उचलतात.]

कमळजा }<br>सावळ्या } श्री शिवाजी महाराज की....

एक खलाशी: (धावत येऊन) थांबा. शिवाजी महाराजाचं आरमार येतंय् !

तांडेल : तोबा तोबा, शैतान का जहाज आ गया ! या पोरांना लपवा आधी कुठं तरी. ही इथं आहेत, हे कळलं, तर आपली खैर

नाही.

माणूस : पण त्यांना मारूनच टाकलं, तर?

तांडेल : शुद्धीवर आहेस ना? तो शैतान आपल्या जहाजाशी भांडण काढायला कारणच शोधतोय्. यांना मारून त्यांना आयतं कारण देऊ? लपवा त्यांना! लपवा कुठंतरी!

माणूस : कुठं लपवायचं, पण?

तांडेल : तिकडं दारूची पोती आहेत–त्यांच्यात लपवा.

[माणूस त्यांना दारूच्या पोत्यांमध्ये लपवतो. एका खलाश्याला बंदूक घेऊन पहारा करायला उभं करतो.]

तांडेल : बाकी सगळे – जल्दी करा. जोरात वल्हवा – आणि त्या काफिराच्या जहाजाच्या टप्प्यातून एकदा जहाज दूर न्या. मग लावूया या मुलांचा निकाल.

खलाशी : आम्ही शिकस्त करतो, साहेब. पण वल्हवणं कठीण आहे. वादळाचा जोर भलताच आहे. (विजांचा कडकडाट.)

कमळजा : (सावळ्याला) दादा, या वादळात हे जहाज बुडेलसं वाटतं.

सावळ्या : कसंही करून महाराजांच्या जहाजावर जायला हवं, कमळे!

कमळजा : पण, दादा – त्याही जहाजाची परिस्थिती वाईट दिसतेय्.

सावळ्या : कदाचित तेही जहाज बुडेल, कमळे – पण या जहाजावर पारतंत्र्यात मरण्यापेक्षा आपल्या जहाजावर स्वातंत्र्यात मेलेलं चांगलं!

कमळजा : पण जाणार कसं त्या जहाजावर?

सावळ्या : आपण समुद्रात उडी टाकू. नशिबानं कुणाचं लक्ष गेलं, तर गेलं. नाहीतर थोड्या वेळानं शत्रूच्या हातून मरण्यापेक्षा समुद्रात लाटांशी खेळत खेळत मरू.

कमळजा : मग? टाकायची उडी?

सावळ्या : थांब, कमळे – नुसतं आपणच मरायचं नाही. मरता मरता शत्रूचं जहाज उडवून देऊ आणि मगच मरू.

कमळजा : म्हंजे?

सावळ्या : माझ्या खिशात चकमक आहे, कमळे.

कमळजा : ती कुठनं आली, रे?

सावळ्या : त्या दिवशी चर्चमध्ये फार गरज पडली चकमकीची. तेव्हापासून मी नेहमी ठेवायला लागलो कनवटीला.

कमळजा : बरं, पुढं काय करायचं त्या चकमकीचं?

सावळ्या : ही इथं दारूची पोती आहेत, पाहिलंस? एक पोतं पेटलं, तरी सबंध जहाज – धुडुम!

कमळजा : आणि हा बंदूकवाला इथं पहारा करतोय्, त्याचं काय?

सावळ्या : त्याला पळव तू तिकडं.

कमळजा : मग? हर हर महादेव!

सावळ्या : हर हर महादेव!

कमळजा : (किंचाळून) मी चालले-आत्ताच्या आत्ता घरी चालले.

[धावत सुटते बंदूकवाला तिच्या मागे धावतो. ती त्याला हुलकावण्या देते. तोवर सावळ्या चकमक पेटवून दारूचं पोतं पेटवतो. धावतच तिच्याजवळ जातो. कुणाला काही समजायच्या आत दोघं जहाजाच्या कडेपर्यंत धावत जातात, आणि–]

सावळ्या, कमळजा : श्री शिवाजी महाराज की जय–

[असं म्हणून समुद्रात उडी टाकतात. खलाशी दचकून उठून उभे राहतात.]

खलाशी १ : बाप, रे! ही मुलं आहेत, की हैवान? खवळलेल्या समुद्रात उडी टाकली.

तांडेल : (संतापून) तुम्ही काय करीत होता? तुम्ही त्यांना अडवलं का नाहीत?

खलाशी १: साहेब, आम्हांला काही कळण्याच्या आतच–

[प्रचंड स्फोट होतो आणि जहाजाच्या ठिकऱ्या ठिकऱ्या होतात.]

## प्रवेश तिसरा

[श्री शिवाजी महाराजांची छावणी. एका पडद्याबाहेर गणोबा राखण करीत बसला आहे. एक खलाशी येतो.]

खलाशी : गणोबा, त्या मुलांना महाराजांच्या भेटीसाठी आणलं आहे.

गणोबा : ते काही नाही. महाराज कधी नव्हे ती थोडी विश्रांती घेताहेत. आता मी त्यांच्या भेटीला कोणालाही सोडणार नाही.

खलाशी : बघ, बुवा—त्या मुलांना भेटावं, अशी महाराजांची फार इच्छा होती.

गणोबा : कुठली मुलं?

खलाशी : त्या दिवशी आमच्या जहाजाला खवळलेल्या समुद्रात सापडली, ती.

गणोबा : काय, रे? या मुलांचं काय डोकंबिकं फिरलं होतं का, रे, खवळलेल्या समुद्रात उडी टाकायला!

खलाशी : नाही, रे—ती पोरं भलतीच धाडसी आहेत. त्यांनी मोगलांच्या जहाजावरून स्वत:ची सुटका करून घेतली—एवढंच नाही, तर ते जहाज स्फोट करून, उडवून दिलं.

गणोबा : काय, रे....ती असतील लाख धाडसी! पण असल्या धोक्याच्या ठिकाणी त्यांना पाठवायला त्यांचे आई-बाप काय मेले आहेत?

खलाशी : दोघेही चांगले जिवंत आहेत, म्हणे—पण कदर नाही पोरांची, दुसरं काय?

गणोबा : मी नसतं, रे, बुवा, माझ्या मुलांना असलं जिवावरचं साहस करू दिलं !

खलाशी : तुझी मुलं ?आहेत कुठं ती ?

गणोबा : आहेत आपल्या घरीच – कुलाब्याला ! फार पाहावंसं वाटतं रे, त्यांना ! [सावळ्या आणि कमळजा आत येतात.]

खलाशी : अरे, अरे – एकदम घुसतात परवानगीशिवाय ?

कमळजा } सावळ्या } : बाप्पाऽ (गणोबाला मिठी मारतात.)

गणोबा : सावळ्या-कमळे अरे मी जागा आहे, की स्वप्नात ?

सावळ्या : आम्हांलाही असंच वाटतंय्, बाप्पा ! तुम्ही महाराजांच्या सेवेत आहात, हे आम्हांला माहीतच नव्हतं.

गणोबा : पण म्हणजे – तो पराक्रम तुम्ही केलात ? आणि मी दुर्दैवी माणूस – की ज्याला असली बहाद्दर पोरं असून त्यांना भेटता देखील येत नाही. तुम्हाला पटायचं नाही, लेकरांनो, पण तुमच्या आठवणीनं मला घास जात नाही, रे ! पण तुम्हांला कुठल्या तोंडानं येऊन भेटू ? या हाताने मी तुमच्या आईचा प्राण – –(सरू येते) कोण – सरू ? आता मात्र मी खरंच भानावर नाही. मला भास होताहेत ? मेलेली माणसं माझ्या-समोर येऊन........

सरु : तुम्हांला भासही होत नाहीत – – रूमी मेलेलीही नाही. चांगली धडधडीत जिवंत आहे.

कमळजा : पण, आई – तू कशी आलीस इथं ?

सरू : काय सांगू, कमळे – तू हरवलीस, तेव्हापासून माझा जीव थाऱ्यावर नाही. मग निघाले स्वतःच तुम्हांला शोधीत. याला विचार, त्याला विचार करीत इथवर येऊन पोचले. चला, आता सगळे कुलाब्याला परत – – आणि तूम्ही हो – तूम्हीदेखील

चला. पुष्कळ झाली चाकरी. तूमच्याशिवाय महाराजांना दुसरं कोणी मिळणार नाही वाटतं?

[पडदा बाजूला करुन शिवाजी महाराज येतात.]

महाराज : (हसून) नाही, सरु. तूझा गणोबा भलताच स्वामिभक्त आहे. त्याच्यासारखी माणसं क्वचितच मिळतात.

सरु : (खजील होऊन) महाराज – मी काय पण, तोंडाला येईल, ते बोलून जाते. महाराजांनी क्षमा करावी!

महाराज : नाही, माऊली – आम्ही कोण तुला क्षमा करणार? तुझा संसार उधळून तुझ्या नवऱ्यानं देशाची सेवा केली – तुझ्यासारख्या कैक माऊल्यांचं ऋण आहे आमच्यावर. तुझ्या पोटी आलेला हा वीर – फार मोठ्ठा पराक्रम गाजवला आहे त्यानं. ! आजपासून आम्ही जहाजं त्याच्या स्वाधीन करुन त्याला या प्रांतांच्या रक्षणाला ठेवणार आहोत.

सावळया : (महाराजांचे पाय धरून) महाराजांची कृपा झाली–माझ्या आयुष्याचं सार्थक झालं.

महाराज : बेटा सावळया, आम्हांला आश्चर्य वाटतं. एवढ्या लहान वयात तू हे साहस केलंस तरी कुणाच्या जिवावर?

सावळया : खरं सांगू, महाराज? हे माझ्या आईचं यश आहे. तिनं मला झिडकारलं, म्हणूनच तर मी घराबाहेर पडलो!

सरू : (हुंदका देऊन) किती लाजवशील, रे, मला? (सावळयाला जवळ घेते.)

सावळया : महाराजाचा जयजयकार असो!

सगळे : महाराजांचा जयजयकार असो!

IRBK-0120800

* पडदा *

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
आ. क्र. 20800 नों. दि. 9e/9/८५
वि. बाल. नाटय ...

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २०८०० नों. दि. १२/९/८...
वि. ना० नाट्य (नाटक) क्र. ..............